
# चैतन्य लहरी

जानेवारी / फेब्रुवारी २००८

अंक क्र. १/२



# ख्रिसमस पूजा २००७, निर्मल नगरी - पुणे







## अनुक्रमणिका


- २६ जानेवारी २००८, प्रतिष्ठान,पुणे ........ २
- दिवाळी पूजा, श्रीमाताजींचे भाषण (सारांश) दिल्ली, १० नोव्हेंबर २००७ ........ ३
- ख्रिसमस पूजा २००७निर्मल नगरी, पुणे (वृत्तांत) ........ ११
- नववर्षाचे आगमन पूजा, ३१ डिसेंबर २००७,प्रतिष्ठान, पुणे ........ १५
- २४ डिसेंबर २००७, पूजा, प्रतिष्ठान,पुणे ........ १५
- लाल बहादूर शास्त्री – उर्दू अनुवादीत पुस्तकाचा प्रकाशन समारंभ – १७ नोव्हेंबर २००७, न्यु दिल्ली ........ १६
- दत्तजयंती पूजा,प्रतिष्ठान, पुणे- दिनांक २३ डिसेंबर २००७ ........ १७
- संक्रांत पूजा, (निराकार) १५, जानेवारी २००८, प्रतिष्ठान पुणे ........ १८
- संक्रांत पूजा (साकार स्वरुपात)प्रतिष्ठान दिनांक १७ जानेवारी २००८ ........ १८
- नाडी ग्रंथातील भविष्यवाणी, श्रीमाताजींनी नाडीग्रंथासंदर्भात सागितलेली माहिती ........ १९


सर्व सहजयोग्यांना कळविण्यात येते की, सहजयोगातील कॅसेट,सी.डी., पुस्तके, मासिके,श्रीमाताजींचे फोटो, कॅलेंडर, चैतन्यलहरी मासिके, श्रीमाताजींची पेंडॉल्स, इ. साहित्य भारतभरातील वितरण व विक्री व्यवस्था, ''**निर्मल ट्रान्स्फॉर्मेशन प्रा.लि.पुणे**'' या कंपनीमार्फत होत आहे. तरी सर्व सहजयोग्यांना कळविण्यात येते की, **निर्मल ट्रान्स्फॉर्मेशन प्रा.लि.पुणे** या कंपनीच्या लेखी परवानगी शिवाय वरील साहित्याची निर्मिती तसेच परस्पर विक्री कुणीही करू नये. तसे केल्यास त्याची जबाबदारी संबंधित सहजयोग्यावर व लिडरवर राहील.

तसेच चैतन्य लहरी मासिकाचे सन २००८ सालासाठी नवीन सभासदत्व घेण्यासाठी धनादेश पाठविताना तो " NIRMAL TRANSFORMATION PVT. LTD." या नावाने पाठविताना पाकिटावर चैतन्य लहरी (मराठी) लिहिणे आवश्यक आहे. सभासदांची वार्षिक वर्गणी मागील वर्षाप्रमाणेच अंक हातपोच घेणाऱ्यांसाठी रुपये २००/– व पोष्टाने मागविणाऱ्यांसाठी रुपये २२५/– एवढी ठेवली आहे. तसेच परगांवच्या सहजयोग्यांनी शक्य झाल्यास ग्रुप बुकिंग केल्यास अंक पोष्टाने पाठविताना सोईचे होईल. कंपनीचा पत्रव्यवहाराचा पत्ता पुढीलप्रमाणे आहे.


NIRMAL TRANSFORMATION PVT. LTD.

BLDG. NO. 8, CHANDRAGUPT HSG. SOC. PAUD ROAD,

KOTHRUD, PUNE 411 O38. TEL. 020 25286537

## २६ जानेवारी २००८, प्रतिष्ठान,पुणे

श्रीमाताजींच्या व श्रीपापाजींच्या उपस्थितीत प्रतिष्ठानच्या लॉनवर झेंडा वंदनाच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. प्रतिष्ठानच्या लॉनवर एकाबाजूला झेंडा उभारण्यासाठीचा खांब उभारला होता. बाजूला छोटेसे स्टेज उभारले होते.झेंड्याच्या मागच्या बाजूला पब्लिक प्रोग्रामसाठी तयार केलेली गाडी उद्‌घाटनासाठी उभी केली होती. लॉनवर जवळपास १००० च्या आसपास सहजयोगी पुढच्या बाजूला बसले होते. श्रीमाताजींचे ९:०० च्या सुमारास आगमन झाले.त्यांच्या सोबत श्री पापाजी होते.आज श्रीमाताजींनी पांढऱ्या रंगाची लाल किनार असलेली साडी नेसली होती. सुरवातीला श्रीमाताजींनी तिरंगा फडकवला.त्यानंतर प्रमुख पाहुणे पोलीस आय.जी.(मोटर विभाग) श्री राजा मानगावकर व त्यांच्या सोबत कमिटीच्या सदस्यांनी राष्ट्रगिताच्या धुनवर झेंड्याला मानवंदना दिली.

त्यानंतर पब्लिक प्रोग्रामसाठी तयार करण्यात आलेल्या गाडीचे उद्‌घाटन श्रीमाताजींच्या हस्ते फित कापून झाले. श्रीमाताजी व श्री पापाजींचे स्टेजवर आगमन झाले. आजचे प्रमुख पाहुणे श्री व सौ मानगावकर यांनी श्रीमाताजींच्या चरणावर हार अर्पण करून त्यांचा अशीर्वाद घेतला तसेच श्री पापाजींना बुके अर्पण केला. त्यानंतर श्री पुगालिया यांनी श्रीमाताजींची परवानगी घेऊन त्यांच्यासमोर पुणे म्युझिक ग्रुपच्या सौ वर्षाने बसविलेली लहान मुलांची नृत्ये कॅसेटवर बसविलेल्या भारत हमको जानसे प्यारा है, वंदे मातरम्, देस रंगीला रंगीला देस मेरा रंगीला, ह्या गाण्यांवर नृत्य सादर केले.

पुणे म्युझिक ग्रुपने जयोंस्तुते जयोस्तुते हे भजन सादर केले. परदेशी सहजयोग्यांनी आदिमाया अंबाबाई साऱ्या दुनियेची आई हे भजन सादर केले.त्यानंतर सौ मानगावकरांचे स्टेजवर बोलावून स्वागत करण्यात आले. त्यानंतर नाशिक सहजयोगी ए.सी.पी. श्री मालेगांवकर व सौ मालेगांवकर यांनी श्रीमाताजींची चरणावर फुले वाहून नमस्कार केला. श्रीमाताजींचे आशीर्वाद घेतले.तसेच श्रीपापाजींना बुके देऊन त्यांचे आशीर्वाद घेतले. पुण्यातून प्रसिद्ध होणारे हिंदी दैनिक आजका आनंद, व संध्यानंदचे संपादक श्री शाम आग्रवाल यांनी श्रीमाताजींच्या चरणावर फुले अर्पण करून त्यांचा आशीर्वाद घेतला.तसेच श्री पापाजींचा आशीर्वाद घेतला. त्यानंतर श्रीमाताजींच्या समोर माईक धरण्यात आला. त्या हसत हसत नको म्हणाल्या. माईक बाजूला केल्यानंतर त्या म्हणाल्या की, 'मेरा मन भर गया'. त्यानंतर श्रीपापाजींनी सर्वांना मार्गदर्शन केले.त्यात त्यांनी ज्यावेळी दिल्लीत इंग्रजांच युनियन जॅक उतरविण्यात येऊन आपला तिरंगा फडकविण्यात आला त्याप्रसंगी आम्ही दोघे तिथे उपस्थित होतो हे सांगितले.

त्यानंतर प्रमुख पाहुणे श्री राजा मानगांवकर यांनी बोलताना सांगितले की आज माझ्या आयुष्यातला सर्वात मोठा आनंदाचा क्षण असून ज्यांनी स्वातंत्र्यासाठी कार्य केले त्यांच्या समक्ष मला उपस्थित रहायला मिळाले याचा मला आनंद होत आहे.यानंतर श्री राजा मानगांवकर व सौ मानगांवकर यांचा सत्कार करण्यात आला. त्यांना श्रीमाताजींचा फोटो असलेली फ्रेम देण्यात आली. त्यावेळी त्यांनी परत श्रीमाताजींचे व श्रीपापाजींचे आशीर्वाद घेतले. त्यानंतर श्रीमाताजींच्या समोर लाडूचा प्रसाद तसेच फुटाण्याचा प्रसाद आणण्यात आला. श्रीमाताजींनी लाडूचा प्रसाद खाल्ला.तसेच फुटाण्याचा प्रसाद व्हायब्रेट केला. त्यानंतर श्रीमाताजींचे परत हॉलकडे प्रस्थान झाले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्री राजेंद्र पुगालिया यांनी केले. हॉलमध्ये श्रीमाताजी व श्रीपापाजींच्या सहवासात श्री मानगांवकर परिवार, श्री मालेगांवकर परिवार व श्री शाम आग्रवाल परिवार बसले होते.त्यावेळी श्रीमाताजींसमक्ष त्यांना अल्पोपहार देण्यात आला.त्यावेळी श्रीमाताजींनी त्यांच्या मुलांची चौकशी केली.त्यांना अशा कार्यक्रमाला आणल्याबद्दल कौतुक केले. त्यावेळी श्रीमाताजी सर्व मुलांच्या खाण्याकडे लक्ष देत होत्या. सर्व पाहुण्यांना खाण्याबाबत आग्रह करीत होत्या. त्यावेळी प्रत्येकाची विचारपुस करीत होत्या. दैनिक आज का आनंद यांना त्यांनी पूर्वी पुण्यात घेतलेल्या कार्यक्रमाची आठवण करून दिली.त्यानंतर श्री मालेगांवकर यांनी श्रीमाताजींना आणलेले प्रेझेंट श्रीमाताजींनी श्री मानगांवकरांना देण्यास सांगितले. त्यानंतर सर्वांनी श्रीमाताजींचा सहकुटुंब सहपरिवार आशीर्वाद घेतला. सर्वांना अनंत आशीर्वाद दिले.

आज श्रीमाताजी अतिषय खुष होत्या. श्रीमाताजींचे हे आनंदी पाहुन सर्वजण खूपच भारावले होते. -जय श्रीमाताजी.

● ● ●

# दिवाळी पूजा

## श्रीमाताजींचे भाषण (सारांश)

## दिल्ली, १० नोव्हेंबर २००७



*दिवाळीचा अर्थच हा आहे की, आपण जसे बाहेर दिवे लावतो तसे आपल्या सर्वांच्यात देखील ते प्रज्वलित झाले पाहिजेत. आपल्याला माहीत आहे की या अंध:कारातील वातावरणात आपण सर्वजण प्रकाश आहात, दिवे आहात.*

*आपल्याला प्रकाश पसरावयाचा आहे. पण जर आपला आतला प्रकाशच कमी असेल तर आपण बाहेरच्यांना कसा प्रकाश देऊ शकाल? याचा आपण विचार करा.*

हॅपी दिवाळी !

आपल्या सर्वांना दिवाळीच्या शुभेच्छा !

हे जे आपण वेगवेगळे नृत्याचे प्रकार आत्ता बघितले त्यातून सर्वांनी एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे कि, हे जे कोणी होते, ज्यांनी हे लिहीले, सांगितले आहे ते सर्व एकच गोष्ट सांगत आहेत. आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे परमेश्वर एकच आहे हेच सर्वांनी सांगितले आहे. त्यांनी वेगवेगळे अवतार घेतले असले तरी परमेश्वर हा एकच आहे.

त्यांच्यामध्ये एकमेकात काही मतभेत नाहीत, भांडणे नाहीत; ते या सृष्टीवर दुष्ट लोकांचा नाश करण्यासाठी, वाईट लोकांना नष्ट करण्यासाठी अवतार घेतात. सर्व ठिकाणी होत आहे. मी पहात आहे की, जे दुष्ट लोक आहेत ते उघडे पडत आहेत, आता सर्वत्र हे घडत आहे, आपल्या सर्वांचे काम हे आहे कि त्यांना बाजूला करा. जे दुष्ट आहेत, वाईट आहेत पैसे मिळविण्यासाठी काहीही करतात असे सर्वजण नरकात जाणार. आम्हाला माहीत नाही की किती नरक आहेत. आता ज्या वातावरणात आपण बसला आहात, ज्या जागेवर बसला आहात, याचा नरकाशी काहीही संबंध नाही. पण आपण यात राहून अधर्मासारखे वागाल, चुकिचे काम कराल तर आपण सुद्धा नरकात जाल. खूप वेगवेगळ्या प्रकारचे नरक आहेत आणि तिथपर्यंत पोहचण्याची व्यवस्था देखील खूप चांगली ठेवली आहे. कारण त्यामुळे तिथे जाणाऱ्यांना माहीत नसते की आपण कोठे चाललो आहोत. जे उरतात ते स्वर्गात जातात. या पृथ्वीवरील कोणाला माहीत नाही की वाईट काम करणाऱ्या सर्वांना नरकात जावे लागते.

दिवाळीचा अर्थच हा आहे की, आपण जसे बाहेर दिवे लावतो तसे आपल्या सर्वांच्यात देखील ते प्रज्वलित झाले पाहिजेत. आपल्याला माहीत आहे की या अंध:कारातील वातावरणात आपण सर्वजण प्रकाश आहात, दिवे आहात. आपल्याला प्रकाश पसरावयाचा आहे. पण जर आपला आतला प्रकाशच कमी असेल तर आपण बाहेरच्यांना कसा प्रकाश देऊ शकाल? याचा आपण विचार करा. तर पहिल्यांदा आपण सहजयोग्यांनी लक्षात घेतले पाहिजे की आपला आतला प्रकाश जागृत ठेवा. यासाठीच कदाचित आपण या सृष्टीत आलो असू. इसामसीपर्यंत याबाबत कोणीही बोलत नव्हते. ते आज्ञाचक्रावर आले. त्यांनी आपल्या सर्वांना दाखवून दिले की, त्यांच्यात कोणत्याही प्रकारचा अहंकार नव्हता, ते परमेश्वराचे पुत्र होते, तरी अहंकार नव्हता. त्यांच्या आधीच्या लोकांनी थोडेफार सांगितले, पण इसामसीनी आपल्या सर्वांचे आज्ञाचक्र ठीक व्हावे यासाठी अवतार घेतला होता.

या दिल्लीत आज्ञाचक्र खूप पकडते. याचे कारण काय? तर पूर्वी इंग्रज इथे वास्तव्य करत होते. त्यांनी आपल्याला अहंकार, घमेंड करायला शिकवले. आपल्याला माहीत आहे की आम्ही ते दिवस देखील पाहिले आहोत की जेव्हा भारत पारतंत्रात होता. त्या पारतंत्रातून आपण सर्वजण बाहेर आलो आहोत. आपण सर्वजण स्वतंत्र

झालो आहोत. स्वातंत्र्य काय आहे? 'स्व' ला ओळखणे. ज्यांनी 'स्व' ला ओळखले त्यांनी 'स्व'च्या तंत्राला जाणले. सहजयोगात आपण स्वत:ला ओळखले असून आपल्याला माहीत आहे की, आपण तंत्र आहोत आणि आपल्याला 'स्व' च्या तंत्राने चालायचे आहे. दिल्लीत खूप काम झाले आहे हे दिसत आहे. दिल्लीच्या बाहेर देखील खूप काम झाले आहे. इथल्या लोकांच्यात जो दोष आहे तो तुम्हा सर्वांना माहीत आहे. मला सांगण्याची आवश्यकता नाही. पण आपण आता स्वतंत्र झालो आहोत तर आपण हे पाहिले पाहिजे कि, आपल्यात तर हा दोष नाही ना?पहिला दोष म्हणजे आपल्या आज्ञा चक्रावर पकड येत आहे. ईसामसी सुळावर चढले पण आपण त्यांच्याकडून काही शिकलो नाही. उलट जे इसाई देश आहेत त्याठिकाणी जास्तच अहंकार आहे. त्याचा प्रभाव आपल्यावर देखील खूप होता. पण इथे सर्वात वाईट गोष्ट ही आहे की, आपण एकमेकांना ओळखले नाही. सगळीकडे भांडणे, मारामाऱ्या, एकमेकांच्या मनात द्वेश, अशुद्ध मन. पहिली गोष्ट म्हणजे सर्वांनी आपली मने स्वच्छ केली पाहिजेत. सहजयोगात हे सर्व शक्य आहे. कुठल्या कुठे लोक पोहचू शकतात. कोणालाही हिमालयात जाऊन बसण्याची आवश्यकता नाही. या दिल्लीत बसून तुम्ही मिळवू शकता. पण आपण चोहोकडे बघितले तर सर्वत्र अहंकारी लोक आहेत. मोठ्या प्रमाणावर आज्ञाचक्र पकडले आहे. त्यामुळे अवघड आहे. आता परमेश्वराने एक नवीन चीज पाठविली आहे ती म्हणजे कॅन्सर. जर आपल्याला कॅन्सर झाला आणि आपले आज्ञा चक्र पकडले असेल, तर ते ठीक होणे मोठे संकट आहे. त्यामुळे ज्याना कॅन्सर झाला आहे त्यांनी सहजयोगात येऊन जर आपला अहंकार आहे तो काढून टाकला म्हणजे ते ठीक होतील.ज्या ठिकाणी सरकार आहे त्या ठिकाणी अहंकार येतो. आपल्याकडे मोठ्या प्रमाणावर शासकिय कर्मचारी असल्याने त्यांच्यात मोठ्या प्रमाणावर अहंकार आहे. यापेक्षा जे बाहेरच्या देशातून आले आहेत ते इथल्यापेक्षा जास्त अहंकारी आहेत. ते दारू पितात. जरा विचार करा इसाई म्हणवून घेता आणि शिवाय दारू पिता. दारू पिणे म्हणजे स्वत:च्या विरुद्ध स्वत: जाणे.आपण आपले आज्ञा चक्र खराब करतो. त्यामुळे आज्ञाचक्राचा मान ठेवला जात नाही.ज्याचे आज्ञाचक्र ठीक झाले असेल तर तो कधीही दारु पिणार नाही.

आपण इकडे तिकडे पहाल तर लोक दारू घेणारे दिसतील. पण त्यांना बाहेर पडण्याचा कोणता मार्ग त्यांना सापडत नाही. कारण त्यासाठी सुद्धा ते दारुच पितात. कोणतेही व्यसन हे माणसाला गुलाम करते. कोणतेही व्यसन. इकडे लोकांना तंबाखू टाकून पान खाण्याचे व्यसन आहे. मला सांगा परमेश्वराने आपल्याला इतक्या प्रेमाणे बनवले आहे ते अशासाठी? आपण या देशातील साऱ्या जगापेक्षा वेगळे आहात. भारतीय आहात. आपल्याकडे दोन/चार रोग मी जास्त पहात आहे. त्यातील एक म्हणजे जेवणाच्या ठिकाणी पैसा खाणे. मी आत्ता ज्या रस्त्याने आले मला खूप वाईट वाटले त्याठिकाणी पूर्वी रस्ता नव्हता. आता नव्याने रस्ता केला आहे. पण कोणीही म्हणणार नाही की हा नवीन रस्ता झाला आहे म्हणून. हे सर्व हिंदुस्थानीच करू शकतात. इतके बेशर्म लोक मी जगात कुठेही पाहिले नाहीत. मोठ्या पेक्षा मोठे हे काम करु शकतात.आज सर्वांनी निश्चय केला पाहिजे की, सर्वप्रथम आपले आज्ञाचक्र ठीक केले पाहिजे. आज्ञा चक्र पकडलेला स्वत:ला जगाचा कारभार मी चालवतो असे समजत असतो. साऱ्या जगाला ठीक मी करु शकतो असे समजत असतो. वास्तविक तो स्वत:च ठीक नसतो तर दुसऱ्याला काय ठीक करणार? आपण असे अनेक लोक पाहिले असतील की ते स्वत:ला फार मोठे समजतात आणि प्रत्यक्षात फार वाईट काम करीत असतात. या देशात लोक पैसे खातात. मला सांगा परमेश्वर यांना माफ करील का?सर्वात मोठा गुन्हा म्हणजे चोरी करणे आणि पैसे खाणे. जो अशा प्रकारचे वाईट काम करीत असेल तर त्याने जरी पूजा केली,वाचन केले, पाठ केले, नमाज पढले, अल्लाहाला आवाज दिला तरी काहीही उपयोग होणार नाही. आज आपल्या नवीन वर्षाची सुरवात होत आहे. आपल्या सर्वांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा. माझी अशी इच्छा आहे की आपण सर्व लोक आजपासून खोटे बोलणार नाही, कधीही खोटे बोलणार नाही. मी जगभर फिरले आहे. हिंदुस्थानी खोटे बोलण्यामध्ये प्रसिद्ध आहेत, आपल्याला खोटारडे म्हणून ठप्पा लागला आहे. आपल्याकडे कितीतरी मोठे संत साधू होऊन गेलेत. ज्या ठिकाणी सुफी सारखे लोक झालेत त्या ठिकाणी खोटे का बोलतात?तर आपण सर्वांनी आज शपथ घेतली पाहिजे की, आजपासून आम्ही खोटे बोलणार नाही. काही झाले तरी खोटे बोलणार नाही. त्यासाठी हिम्मत

पाहिजे. आपण तर पार झालेले आहात त्यामुळे आणखी काय हिम्मत पाहिजे? आपण खोटे बोलू शकत नाही.जर तुम्ही असे झालात तर लोक तुमच्यावर विश्वास करतील कि तुम्ही खरे आहात.

सहजयोग्यांनी खरे वागले पाहिजे. आपण जरी मोठे व्यवसायिक असाल, इंजिनीअर असाल, सडक तयार करणारे ठेकेदार असाल, डॉक्टर असून सर्वांवर उपचार करीत असला तरी आपल्यासाठी हा नरक ठरू शकतो. तेव्हा पार झालेले जर खोटे बोलू लागले तर त्यांना काहीही फायदा होणार नाही. आपल्या देशाबाबत बाहेर बोलतात ते ऐकल्यावर मला फार वाईट वाटते कि आपल्याकडील लोक फार खोटारडे, फसवे,पैसे खाणारे आहेत. आज फार शुभ दिवस आहे. तेव्हा सर्वांनी निश्चय केला पाहिजे की, आजपासून आम्ही खोटे बोलणार नाही, काही झाले तरी. आम्ही स्वत: कधी खोटे बोलत नाही. खोटे बोलण्याने स्वत:चे नुकसान होते. खोटे काम केल्याने आपलेच नुकसान होते. अशा खोटारडे फसवेगिरी करून कितीही पैसा कमवलात तरी आपण स्वर्गात जाऊ शकणार नाही आपण नरकातच जाल.

सर्वांनी माहीत करून घेतले पाहिजे की जगात आपल्या देशाबद्दल खूपच बदनामी झाली आहे. ही बदनानी का झाली कारण आपल्याकडे असे वाईट लोक आहेत. आपण एक संस्था तयार करा. आपल्या लक्षात आले की हा खोटा आहे तर आपण त्याला जाब विचारा की 'साहेब याचा अर्थ काय?' जसे हा रस्ता ठीक बनविला नाही तर तुम्ही माहिती मिळवा की, किती पैसे खर्च झाले आणि यात कोणी किती पैसे खाल्लेत? पैसे खाणारे दारुच पिणार. दारु तर आपली दुष्मन आहे.

आपल्या सर्वांची अवस्था चांगली आहे. खूप देशात गरीब लोक आहेत. मी पाहिले आहे की, ते प्रामाणिक आहेत. प्रामाणिकता सर्वात प्रथम पाहिजे. आज सर्वांनी निश्चय केला पाहिजे की मी कोणाशी बेईमानी करणार नाही. आणि बेईमानी करणाऱ्यांना साथ देणार नाही. कोणी तसे केले तर त्याला उघडे पाडू. आत काही जण म्हणतील की, पोलिस सुद्धा असे आहेत, तसे आहेत. पण तुम्ही लक्षात ठेवले पाहिजे की तुम्ही सहजयोगी आहात.सहजयोगी हे कोणत्याही पोलिस अधिकाऱ्यापेक्षा कमी नाही. सहजयोग्यांत फार शक्ती आहे. सर्व शक्ती प्रामाणिकपणाची आहे. प्रामाणिक असलाच पाहिजे. मी खूप खुश आहे कारण खूप सहजयोगी प्रामाणिक आहेत, सच्चे आहेत. आपल्याला आणखी प्रामाणिक सहजयोग्यांची आवश्यकता आहे. प्रामाणिकपणा अतिशय आवश्यक आहे. नाहीतर आपले आज्ञाचक्र सुटू शकणार नाही. अहंकारामुळे आज्ञावर पकड येते. एकदा अहंकार आला की तो कोणतीही मोठी चूक करू शकतो, वाईट वागू शकतो, दुसऱ्याचे नुकसान करू शकतो, पैसा खाऊ शकतो त्यामुळे तो शेवटी नरकात जातो.

मी आपल्याला सांगते की आपण पैसे खाता कामा नये.त्यामुळे आपण काही मरत नाही. ज्यास्त पैसे जमवून काय करणार? दोन चार ठिकाणी घरे घ्याल- उजेड पाडाल, दोन चार बायका ठेवाल त्यामुळे काय? पण आपण जेव्हा नरकात जाल त्या ठिकाणी आपले फार हाल होतील. आजच्या या दिवाळीच्या दिवशी मी हे सांगते आहे, कारण आजच्या या दिवशी सीतामाई प्रभुरामचंद्राकडे परत आल्या. ज्यावेळी आपल्यात चारित्र्य येईल त्यावेळी आपण (वाईट सवईच्या) गुलामीत राहू शकणार नाही. आपण स्वत:चेच गुलाम आहात.दुसऱ्यांचे नाही. नंतर आपण कोणत्याही गोष्टीसाठी खोटे बोलणार नाहीत. आम्ही दिल्लीत खूप दिवसापासून राहिलो आहोत. आम्ही हैराण झालो आहोत की किती लोक खोटे बोलतात म्हणून! बाप रे बाप, त्यांना भीती वाटत नाही ! सफाईदारपणे खोटे बोलणे. त्यामुळे मला माहीत नाही कदाचित त्यांना फायदा होत असेलही. काही रुपये पैसे मिळवित देखील असतील.पण त्यामुळे ते कधीही स्वर्गात जाणार नाहीत. माझी अशी इच्छा आहे की, सहजयोग्यांनी आज शपथ घेतली पाहिजे की, आजपासून मी कधीही खोटे बोलणार नाही आणि कधी खोटे बोलणाऱ्याना मदत करणार नाही.

बाहेरच्या देशातील आपल्या लोकांना बेइमान लोक आहेत असे म्हणतात. मी खूप जग पाहिले आहे. सर्वात मला रशियाचे लोक आवडतात. खूप चांगले सहजयोगी आहेत. मी रशियाला या वर्षी देखिल जाऊ शकले नाही. पुढच्या वर्षी जाणार आहे. पण याचा अर्थ हा नाही की आम्ही लोकशाही रुजवू शकलो नाही. त्यांचे पाहिल्यावर आपल्याला सुद्धा कम्युनिस्ट व्हायला हवे असे वाटते. तिकडे चोरी, लबाडी , खोटे बोलणे अजिबात नाही. सर्वकाही प्रेमाने. खूप प्रेम. मला पण खूप

मानतात. आपल्याला समजले पाहिजे की आपण कुठे चाललो आहोत. दोन चार पैशासाठी आपण कुठे चाललो आहोत? त्यापासून आपण काय मिळवणार आहोत? तर पहिल्यांदा आपल्याजवळ प्रामाणिकपणा असायला हवा. तुमच्या फसवेगिरीमुळे तुमच्याच लोकांना त्रास होतो.

हिंदुस्थानी लोकांना बेईमान लोक आहेत असे म्हणतात. हे ऐकून मला लाज वाटते. तुमच्याकडे कितीतरी संत झाले, महान योगी झाले, तरी या ठिकाणी फार चोर लोक असून चोऱ्या करतात? वाईट वागतात? ह्या अगोदर आपली आज्ञा घाबरले आहे, मोठे श्रीमंत झाले. शेवटी पहा.हे वाईट वागून मोठे झालेले सर्व जण आता नरकाकडे चाललेले पहायला मिळतात. मी आपल्याला आज दिवाळीच्या दिवशी सांगते की, नरक म्हणजे अंध:कार आणि तुम्ही प्रकाश झाला आहात. आता तुम्ही ज्या ज्या ठिकाणी अंध:कार - अंधार आहे त्याच्या विरुध्द उभे रहा त्यांना सांगा हे सर्व वाईट आहे. त्यामुळे आपला देश सुधारेल. पूजा- पाठ आपण करीत आहोतच. पण आपल्या आतील शक्ती आहे तिचा उपयोग असत्याच्या विरोधात करा. खूप लोकांना माहीत नाही की पैसे मिळवणे हा रोग आहे. ते सर्व नरकात जाणार. मी आपल्याला हे यासाठी सांगते कारण यापूर्वी याबाबत कोणी हे सांगितलेले नाही. दिवाळीच्या दिवशी मी आपल्याला सांगते की, आपण आनंद साजरा करू, दिवे लावू आपल्या हृदयात. त्या दिव्यांमुळे आपल्या लक्षात येईल की कोण कसे आहे, कोण चोर आहेत. आता मी एक दुसऱ्यांची भांडणे पहाते. हिंदु -मुस्लिमांची लढाई आता नष्ट झाली आणि दुसऱ्या लोकांची सुरू झाली आणि दुसरी गोष्ट आम्ही भांडखोरपण खूप आहोत.

दुसऱ्या देशात इतके धर्म नाहीत. आपल्याकडे कोणत्याही कारणावरून भांडणे होतात. भांडणे पहिली. नवरा-बायकोत भांडणे, त्यांच्या मुलांमध्ये भांडणे, परत त्यांच्यात आणखी भांडणे. सहजयोग काय आहे? सहजयोगात प्रेम आहे. फक्त प्रेम. आपल्या आत जी प्रेमशक्ती आहे तिला जागृत करा. आजचा खूप शुभ दिवस आहे आणि आपल्याला आपल्या हृदयात दिवे लावायचे आहेत.आपण निश्चय केला पाहिजे की, आम्ही मेलो तरी खोटे बोलणार नाही. आपल्याकडे पूर्वी असे लोक झाले होते. आता आपले इतके नाव खराब झाले आहे की, हिंदुस्थानी बेईमान आहेत म्हणून. माझ्या पहाण्यात आले नाहीत पण ऐकण्यात आले त्यामुळे फार दु:ख होते. आपला हिंदुस्थान सारखा दुसरा पवित्र देश नाही. ज्या ठिकाणी अनेक मोठमोठ्या संतांनी जन्म घेतला तेवढा दुसरीकडे कोठे नाही.सुफी आहेत, या ठिकाणीच जन्मले. जेवढे महान लोक झाले ते सर्व हिंदुस्थानात झाले. त्यांच्या नंतरच्यांनी जे शिकवले त्यामुळे लोक चोर झाले, जे चोरी करतात ते कधी स्वर्गात जाणार नाहीत. या ठिकाणच्या जीवनापेक्षा जास्त काळ जीवन नर्कात घालवावे लागेल. आजच्या दिवशी मी नर्काबाबत अशासाठी सांगत आहे कारण नरक म्हणजे अंधार आहे तो नरक मी पहाते आहे. आता आपले दिवे जागृत झालेत. त्यामुळे आपल्या लक्षात येईल की कोण नरकात जाणार ते.आता तुम्ही सरकारला मदत करा त्यांना बेईमान लोकांना पकडून द्या. खोटे बोलणाऱ्यांना पकडून द्या. आपण छोट्या पोजिशनवर असाल किंवा मोठ्या पोजिशनवर, आपण सांगून टाकले पाहिजे कि कोण चोर आहे, चोरांना पकडा, खोटे बोलणारांना पकडा. आता तुमच्याजवळ शक्ती आहे ती कशासाठी? तुम्ही जागृत झालात, तुमच्यात प्रकाश जागृत झाला तो कशासाठी. त्या प्रकाशात आपण स्वत:ला पहा. अंधारात काही दिसणार नाही. पण प्रकाशात पहा की आपण कशासाठी आहोत? आणि खोटे बोलण्यापासून आपल्याला काय फायदा आहे? आम्ही संसारी आहोत आम्ही कधी खोटे बोलत नाही. कधीच नाही. आणि बोलू शकत नाही. ज्यावेळी आपण खोटे बोलाल त्यावेळी आपली आतली प्रकाशाची शक्ती नष्ट होईल. आपण दिवे असल्याने या आजूबाजूच्या अंधारापेक्षा वेगळे आहात. आपल्या प्रकाशाने या अंधाराला नष्ट करावयाचे आहे.

आपल्या देशातील लोकांना जगभर बेईमान समजतात पण आपल्या देशासारखे लोक कुठेच नाही. हे ऐकून खुप दु:ख होते. किती चुकीचा आपल्याबद्दल समज झाला आहे म्हणून. हे लोक बेईमानी करू न काय मिळवतात? त्यांचा शेवट भयंकर आहे. जेवढे बेईमान आहेत ते सर्व उघडे पडतील. त्याची व्यवस्था झाली आहे. आपण पार झालात कारण आपण बेईमान नव्हता म्हणूनच.आपण पार झालेले सत्यावर प्रेम करता आणि सत्याचा आदर करता. माझी अशी इच्छा आहे की आपण सत्याच्या बाजूला उभे राहिले पाहिजे. जसे जमुना नदीत लोक कचरा टाकतात. जमुनातर सरळ नरकातच उतरते, पण त्या नरकातपासून तुम्ही

वाचाल कारण तुम्ही पार झाला आहात. ज्याची जागृती झाली आहे ते घसरत नाहीत. पण जर आपल्याला खरोखर सहजयोगात आतमध्ये उतरायचे असेल तर प्रथम निश्चय करा की, काही झाले तरी बेईमानी करणार नाही. पैसे कमवणे हा या दुनियातला धंदा झाला आहे. त्यामुळे काय होते? कोणी पैसेवाल्याला लक्षात ठेवत नाहीत. जर आपले आपल्या देशावर प्रेम असेल तर प्रथम खरेपणा जोपासा. नाहीतर खोट्या माणसाच्या प्रेमाचा काय भरोसा? हे फार अवघड आहे. आपण पहाता की आपला शेजारी असा आहे तर आपण पण तसेच होऊ. पण आपण असा का विचार करीत नाही की आमच्यासारखे आमच्या शेजाऱ्यांना तयार करु. आपण छोट्या पोझिशनवर असाल किंवा मोठ्या पोझिशनवर. आपण सांगुन टाकले पाहिजे की कोण चोर आहे.खोटे बोलणाराला पकडा, चोरांना पकडा. सर्वात प्रथम आज सर्वांनी शपथ घेतली पाहिजे की आम्ही आजपासून बेईमानी करणार नाही आणि बेईमानांना प्रोत्साहन देणार नाही म्हणून. खोटारडेपणा हा आपल्या देशाला शाप आहे.खूप लोक सकाळ पासून संध्याकाळपर्यंत कमीतकमी दहावेळा तरी खोटे बोलतील. पण तरी त्यांचे पोट भरत नाही. आता आपली गरिबी दूर झाली आहे. सर्व काही ठीक चालले आहे.खाणे-पिणे सर्व ठीक आहे. आता तुम्ही भीकारी नाहीत. मग खोटे का बोलता? आजच्या दिवशी सर्वांनी निश्चय करा की आम्ही खाटे बोलणार नाही आणि कोणी खोटे बोलणारा असला तर त्याला साथ देणार नाही. आमचा त्याच्याशी काहीही संबंध राहणार नाही.यातच खरा आनंद, सुख आहे. त्यामुळे खोटे लोक नरकात जातील आणि त्यांच्यामागे आपणसुद्धा जाल.आपल्याला परमेश्वराने जागृत केले आहे. आपल्या आतल्या प्रकाशाकडे पहा. तुमच्यासारख्या लोकांनी निश्चय केला पाहिजे की, काही झाले तरी, अगदी आमची मान कापली तरी, आम्ही कधी खोटे बोलणार नाही.

भारतात बरेच जण चांगले आहेत हे मला माहीत आहे. पण ज्यावेळी बाहेरच्या देशात मी आपल्या लोकांबद्दल वाईट ऐकते त्यावेळी फार दु:ख होते.जसा हा जो रस्ता तयार केला आहे हा काय रस्ता आहे? मला तर वाटते की आपण जंगलात चाललो आहोत. याबाबत आपल्याला काही समजले तर तुम्ही सर्वांनी त्याला जाब विचारा की असा रस्ता कोणी बनविला? का बनविला? कोणी पैसे खाल्ले? तुम्ही सर्वजण एक होऊन भारतात घुसलेल्या या भुताला बाहेर काढा.कोठेही गेलो तर लोक म्हणतात की हिंदुस्थानींवर विश्वास ठेवू नका. किती लाजण्याची गोष्ट आहे ही! ज्यांच्यावर सर्वात जास्त विश्वास ठेवायला हवा ते तर हिंदुस्थानीच आहेत. आपल्याकडे अनेक लिडर, महान आत्मा, लिडर महान लोक होऊन गेलेत. त्यांचे किती जगभर आज नाव आहे. त्यांना लोक कितीतरी मानतात. आपल्याला पण मानतात हे मला माहीत आहे. पण तुम्ही चोरांबरोबर उभे राहू नका. जर आपल्या लक्षात आले की हा माणूस चोर आहे तर त्याच्या घरी खाऊ नका. त्यामुळे चोर फार अडचणीत येतील.

मी आपल्याला सांगते की, तुम्ही सर्वजण परमेश्वराने नेमलेले पोलीस आहात.जेवढे चोर आपल्याला आढळतील त्यांच्या नोंदी ठेवा. यासाठी आपल्या मुलांच्यात देखील हिंम्मत तयार करा. जर कोणी वाईट काम करताना,खोटे बोलताना आपल्याला दिसले तर त्याची माहिती मिळवा. आपला देश मोठ मोठ्या संतांनी जागृत झाला आहे त्यामुळे आपण सगळे संत आहात.तुम्हाला खोटे बोलण्याची आवश्यकताच नाही. एकवेळ जेवण मिळाले नाही तरी चालेल त्यामुळे काही कोणी मरत नाही. आपल्याला खाण्या पिण्यासाठी मीळत आहे पण त्यावर दारू पितात, ज्यामुळे आपण नष्ट होऊन जाऊ. दारु घेतल्याने काही आपले चांगले होत नाही.अमेरिकेत नवीन गोष्ट सूरु झाली आहे. सोळा वर्षाचा मुलगा/मुलगी झाली की त्यांना पालक सांगतात की तुम्ही आता घराबाहेर जा. मग ते नोकरासारखे गाड्या पुसून काम करून पैसे मिळवतात. मी तिकडे सगळीकडे ही सोळा वर्षांची गरीब मुले काम करताना पहाते.आपल्याकडे मुले सोळा वर्षाची झाली तरी आपण त्यांना लहान समजतो. तो काय करणार? त्याला कसे जमणार? असा विचार करतो. त्याला या वयात आपल्याकडे कधीच घराबाहेर काढत नाही. अमेरिकेत मात्र आई-वडील दोघेही त्यांना घराबाहेर काढतात. अशा अमेरिकन्सचे किती दिवस चालणार? तुम्ही पहाल ते नष्ट होत चालले आहेत. एकदोन विमाने घेण्याने कोणी मोठा होत नाही. आपण कोठे आहात? आमचा हिंदुस्थान असा देश आहे की साऱ्या जगाला वाचवू शकतो . पण त्यासाठी आपल्याकडे खरेपणा आला पाहिजे. सगळीकडे खरेपणा, प्रत्येक गोष्टीत खरेपणा आला पाहिजे. मला हे कळत नाही की खोटे वागण्याची आवश्यकताच काय?

आता जे श्रीमंत आहेत त्यांनी आता थांबले पाहिजे त्यांना आता आणखी कमवण्याची आवश्यकता नाही.जास्त पैसे मिळवलेले लोक मी आजपर्यंत आनंदी झालेले पाहिले नाही.आपण सहजयोगी आहात. आपल्या आतमध्ये प्रकाश जागृत झाला आहे. त्या प्रकाशात आपल्याला आपला सत्याचा मार्ग दिसतो.जरी आपण हिंदु असला, मुसलमान असला, इसाई असला तरी काही फरक पडत नाही. आपण सर्वजण मनुष्य आहात. आणि जर माणसात प्रामाणिकपणा नसेल तर तो बेईमान आहे.प्रामाणिकपणाचे अनेक फायदे आहेत.सर्वात मोठा म्हणजे परमेश्वराचे आपल्याला आशीर्वाद मिळतात.असे अशिर्वाद मिळतात की सहजासहजी आपले सर्व ठीक होते. मात्र भारतातील लोक हे कसेही असले तरी सर्वजण पैशाच्याच मागे लागतात.तसेच अनेक गरीब पण आहेत. आज त्यांची सुद्धा दिवाळी साजरी झाली पाहिजे. ते सुद्धा आनंदी झाले पाहिजेत. आम्ही आमच्याच लोकांना धोका देतो.फार हुषार आहेत. यामुळे आपल्यात अहंकार येतो. त्यामुळे कोणीही वाचू शकत नाही.अहंकारामुळे कॅन्सर झाला तर तुम्ही वाचू शकत नाही.त्यावेळी मी सुद्धा वाचवू शकत नाही.तुम्हाला एक खरी गोष्ट सांगते की सर्वात प्रथम आपला अहंकार आहे तो जाळून टाका, नष्ट करा. अहंकाराबाबत लाज वाटली पाहिजे. कोणत्या गोष्टीचा अहंकार आहे? आपल्या देशात तर कशाचाही अहंकार येऊ शकतो.एखाद्याने बी.ए. पास केले की आला अहंकार.त्यापेक्षा जास्त शिकला की आला जास्त अहंकार. डॉक्टर झाला की आला अहंकार,इंजिनीअर झाला की आला अहंकार. त्यामुळे आज्ञा चक्रावर पकड येऊन ते सर्व नरकात जातात. ती एक महाभयंकर जागा आहे. आपल्याला परमेश्वराने बुद्धी दिली आसून तुम्ही सर्वजण पार झाला आहात.तरीदेखील तुम्हाला नरकात जावयाचे असेल तर खुशाल जा.आजपर्यंत हे कुणी सांगितले नाही.आजचा दिवस खूप शुभ आहे. खूप चांगले काम झाले. प्रभू रामचंद्रांच्या काळात सीताजी परत आल्या.अजून बरीच कामे झाली आहेत ती सर्व पार लोकांकडूनच झाली आहेत.

आज सर्वांनी निश्चय केला पाहिजे की, आजपासून बेईमानी कधी करणार नाही जो कोणी करताना दिसेल त्याला पकडून देऊ. मी पहाते या देशात काळ्यांचे-गोऱ्याबरोबर भांडण, आणखी कोणाचे तरी भांडण. भारतात एकमेकांपासून तोडून काही कुणाचा फायदा नाही होणार. त्यापेक्षा तुम्ही ज्यावेळी प्रामाणिक वागाल तुमचे चारित्र्य चांगले असेल त्यावेळी ठीक होईल. इंग्रजांकडून काही शिकण्यासारखे नाही. आजकाल त्यांची अवस्था फार वाईट आहे.पण आपल्याला आपल्या देशाला वाचवायचे आहे तसेच सर्व जगाला वाचवायचे आहे. आता तुमच्यावर फार मोठी जबाबदारी आहे. तुम्ही पार झाला आहात तरी खडड्यात पडायचे असेल तर कोण काय करणार? माझी अशी इच्छा आहे की सहजयोग्यांची एक कमिटी तयार झाली पाहिजे. ज्याठिकाणी आपल्याला चोरीची माहिती मिळाली की कमिटीला सांगा. कमिटी सर्व ठीक करेल, त्यामुळे कमिटीचे नाव होईल. आपली पोझिशन वाढेल.सर्वात प्रथम तुम्ही बेईमानी करावयाची नाही.करणाऱ्याला करु द्यावयाची नाही,देशावर कलंक आहे. आपल्या देशात तेलात भेसळ, तुपात भेसळ,जिकडे पहाल तिकडे भेसळ. सगळीकडे लोक आपल्याला त्यामुळे हसतात.

कोणी आपल्यावर विश्वास ठेवत नाही. तसे पाहिले तर सर्वात चांगले लोक भारतात आहेत. इतके लोक दुसरीकडे पार नाही झाले. पैसे कमविण्यापेक्षा पुण्य कमवा. गरीब लोकांकडे पहा. आजचा दिवस फार आनंदाचा आहे. कारण आजच्या दिवशी आपल्याला स्वर्गाची प्राप्ती झाली आहे. आम्हा सर्वांना स्वर्गातच रहाण्याची इच्छा आहे.पण स्वर्गात भित्रे लोक जाऊ शकत नाहीत. घाबरण्याचे काही कारण नाही. अरे दोन पैसे कमी मिळाले किंवा जास्त मिळाले त्याने काय फरक पडणार आहे? १७-१८ वर्षापासून पहात आहे की आता लोक पूर्वीपेक्षा श्रीमंत झालेत. पूर्वीपेक्षा त्यांची स्थिती चांगली झाली आहे.पण सकाळपासून संध्याकाळपर्यंत बेईमानी सगळीकडे नुसती बेईमानी. आज सर्वांनी शपथ घेतली पाहिजे की, कोणीही बेईमानी करणार नाही. कोणी आढळल्यास त्याचा आम्ही विरोध करू.सहजयोगात तुम्हाला का आणले, पार केले, तर तुम्ही हा (आत्म)प्रकाश सर्वत्र पसरवा. आपण बेईमानांना मदत करतो त्यामुळे आपल्या आतला प्रकाश नष्ट होतो, तर आपण तो दुसऱ्यांना काय देणार? दोन पैसे कमी जास्त कमविण्याने काही फरक पडत नाही. पण जर तुम्ही प्रामाणिक असाल तर प्रत्यक्ष परमेश्वर तुमच्या पाठिशी रहातो. आपल्या देशात जेवढे लोक मरतात तेवढे दुसरीकडे कोठे मरताना दिसत नाहीत कारण मरणारे सर्वजण नरकात जातात. तुम्ही बेईमानी केली की

तुमचे एक पाऊल नरकाकडे पडते. त्यामुळे परत खोटे बोलण्याची वाट पहावी लागत नाही.

तुम्ही सर्वांनी खरे बोलले पाहिजे. जो माणूस नेहमी खरा बोलतो तो एक वेगळा होतो. त्यात जर सहजयोग करीत असेल तर भव्य होतो. जसे आज तुम्ही सुफींची आठवण काढता तसे त्यावेळी तुमची लोक आठवण काढतील.तुम्ही काही करू नका फक्त बेईमानांना पकडा. याची आवश्यकता आहे. इथे लोक भांडतात की जमुनामध्ये कचरा टाकू नका म्हणून. मी इतक्या देशात फिरले आहे पण कुठेही कचरा नदीत टाकताना आढळत नाही. अरे तुम्ही कचरा म्युन्सिपालटीकडे द्या. त्यांना त्यासाठी कर द्या. आम्ही असे लोक पाहिलेत की त्यांनी कधी बेईमानी केली नाही आणि बेईमान लोकांच्याकडे कधी ते जात नसत. त्यांच्याशी कोणताही संबंध ठेवत नसत. कारण ते आपल्या कल्याणाबरोबर देशाचे कल्याण करीत होते. आपण सहजयोगी आहात. फक्त शपथ घ्या की आम्ही कधीही कसली बेईमानी करणार नाही. फक्त ओळखा आणि आपल्या आंतरात्माला सांगा की हा बेईमान आहे आणि सहजयोगी आहे. तर आपण एकत्र येऊन बेईमान लोकांना उघडे पाडा तुम्ही जरी बारा सहजयोगी एकत्र आलात तरी खूप झाले कारण परमात्मा या कामासाठी तुमच्या पाठीशी आहे. थोड्याफार श्रीमंत लोकांमुळे देशाचे भले होणार नाही. पण प्रामाणिक लोकांमुळे होणार आहे. पण सर्वात मोठी गोष्ट आपल्यावर कलंक हा आहे की बेईमान आहोत आणि सहजयोगी कधीही बेईमान असत नाहीत यावर माझा विश्वास आहे. सगळे झगडे सोडून आपण एकत्र झाले पाहिजे. आपण सर्व इमानी आहोत. आपला देश बदनाम आहे म्हणून. आजपासून कोणी बेईमानी करताना आढळले तर त्याला सर्वांनी मिळून त्याचा पाठलाग करा, त्याची झोप उडून जाईल.मला वाईट वाटते की प्रत्येक गोष्टीमध्ये बेईमानी.अगोदर हे लहान लहान गोष्टीमध्ये अऊटकास्ट करत होते आणि आपल्याला वेगळे करत. पुर्वीपासून आपला देश इमानदार आहे.आपल्यामध्ये एवढे चांगले गुण होते, आपण का विसरलो आहोत? कुठे गेले ते? सगळीकडे मी पहाते नुसती बेईमानी प्रत्येक पावला पावलावर बेईमानी.तुम्ही तुमच्या मुलांना शिकवले पाहिजे की कधीही बेईमानी करायची नाही म्हणून. प्रामाणिक वागाल तर परमेश्वर तुम्हाला मदत करील. नाहीतर जगातले सर्व वाईट आजार तुम्हाला जडतील. आजकाल दारु पिणे ही फॅशन झाली आहे. आपण काय वेडे बनन्याकरता इथे आला आहात. जे कोणी करतात त्यांची मैत्री सोडा त्यांना मदत करु नका मी पाहिले आहे की जे कोणी दारु पितात अशांच्या घरी लोक जातात आणि ते देखिल दारू ढोसतात. तर अशांच्या घरी जाणे बंद करा. आपल्या देशाचे आपल्यालाच भले करावयाचे आहे. आपल्या लक्षात आले की एखादा माणूस बेईमान आहे तर त्याच्या घरी जाणे बंद करा, त्याच्याबरोबर खाणे बंद करा. त्याच्याशी कोणत्याही प्रकारचे संबंध ठेवू नका. तुम्हाला परमेश्वराने प्रकाश दिला आहे त्याकडे पहा. त्याची शक्ती खूप मोठी आहे. तुम्ही जरी असा विचार केला की ज्याने देशाशी गद्दारी केली त्याला परमेश्वर सोडणार नाही तरी खूप झाले. पण तुम्ही बहिरे झालात, असा माणूस काही चांगले करत नाही.तुम्हाला काही समजत नाही. आजपासून प्रामाणिक वागण्याची प्रतिज्ञा करा, प्रामाणिक वागणाऱ्यांनाच साथ देण्याची प्रतिज्ञा करा. आपल्या देशात आणखी आत्मसाक्षात्कारी लोक जन्म घेतील.पण त्यासाठी सगळीकडे प्रामाणिकपणा हवा. तर आजचा माझा संदेश हा आहे की आपल्या आत्मसाक्षात्काराच्या प्रकाशात त्याचा वापर करा. त्यापासून तुम्हाला शक्ती मिळेल.तुम्हाला जे काही करावेसे वाटते ते करा. पहा तुम्ही आपली स्वतंत्रता मिळविली आहे.'स्व' ला ओळखले आहे.

माझी अशी इच्छा आहे की इथे खूप मुले जन्मावीत,पार व्हावीत. त्यासाठी सर्वप्रथम सर्वांनी शपथ घेतली पाहिजे की खोटे बोलणाऱ्यांना कधीही मदत करणार नाही! ना त्यांना घाबरणार! परमेश्वर त्यांच्या पाठिशी नसून तुमच्या बरोबर आहे याची जाणीव ठेवा. एकमेकांबरोबर भांडत बसता, ते योग्य नाही. तुम्ही कशासाठी भांडता? महामुर्ख, काय पाहिजे तुम्हाला? तुम्हाला खायला चांगले आहे, प्यायला चांगले आहे, आणखी काय पाहिजे तुम्हाला? आजकाल असे भारी कपडे पाहिजेत, मोठे घर पाहिजे अशा प्रकारचे लोक शेवटी नरकाकडेच जाणार. आता जसे सुफी झाले, आपण पण सूफीच आहात. तुम्ही सर्वजण स्वच्छ झालात. आता तुम्ही प्रामाणिकपणावर कविता करा, खोटेपणा नष्ट करा. आपला भारत

आज इतका गरीब राहिला नाही की त्याला खोटे बोलण्याची आवश्यकता वाटावी. तरुणांनी आपल्या देशाचा हा कलंक पुसण्याचा प्रयत्न करा.तुमच्याकडे प्रकाश आहे त्यामुळे तुम्हाला हिम्मत मिळेल.काहीही अशक्य नाही. यमुनेमध्ये कचरा टाकण्याच्या विषयापेक्षा महत्त्वाचे आहे ते म्हणजे तुमचा स्वतःच्या प्रामाणिकपणावरचा विश्वास उडणे. सत्यासाठी आज सर्वत्र दिवे लावले जातात. आज जगात सर्वात जास्त सहजयोगी भारतात आहेत. त्यानंतर रशियात आहेत. आता रशियन लोक फार प्रामाणिक वागतात. आपल्याकडे कम्युनिझम आले तर कदाचित आपण सुद्धा त्यांच्यासारखे प्रामा णिक होऊ जबरदस्तीने करायला भाग पाडणे ही काही फार मोठी गोष्ट नाही. आजच्या दिवशी आपण सर्वांनी निश्चय केला पाहिजे, की आजपासून आम्ही कधी वाईट वागणार नाही आणि दुसऱ्यांनादेखील वाईट वागू देणार नाही. त्यामुळे आपला देश खूपच समृद्ध होईल. ह्या वाईट लोकांमुळे आपल्या देशातील धर्म नष्ट होत चालला आहे. तेव्हा आजचा माझा संदेश म्हणजे आम्ही प्रामाणिक राहू आणि दुसऱ्यांना देखील प्रामाणिक रहावयास भाग पाडू.

इथले लोक हे करायला टाळतात, घाबरतात. आपण आत्मसाक्षात्कार मिळवला आहे तर घाबरायचे कारण काय? घाबरण्याची आवश्यकताच काय? माझी तुम्हा सर्वांना विनंती आहे की, हिंम्मत वाढवा. 'स्व' च्या तंत्राला जाणा, त्याचा वापर करा. या दिल्लीत यापूर्वी मी कधी पाहिले नव्हते एवढे लोक आज पहातेय.तेव्हा या वाईट वागणाऱ्या राक्षसाला नष्ट करण्याचा निश्चय करा. हिंदुस्थानातील लोक जमिनीसाठी एकमेकात भांडत बसतील. अरे आपले आहे ते 'स्वराज्य' आहे 'स्व' का राज्य . स्वराज्य ज्यावेळी तुम्ही खरोखर स्वतंत्र व्हाल त्यावेळी होईल.कोणालाही घाबरण्याचे कारण नाही. कोणाला काही सांगण्याची आवश्यकता नाही. दिल्लीत यापुर्वी मी कधीच एवढे लोक पाहिले नव्हते.तर आज या शुभ दिवशी निश्चय करा की आम्ही कधीही बेईमानी करणार नाही आमचा प्राण गेला तरी चालेल. मागील दहा वर्षात आपला देश फार खराब झाला आहे.तुम्ही इतक्या संख्येने सहजयोगी आहात तुम्हाला कोणाला घाबरण्याचे काय कारण?कोणत्या गोष्टीला घाबरावयाचे? सर्वांच्या पाठीशी परमेश्वर आहे. सुफींच्या लक्षात आले की परमेश्वर त्यांच्या पाठीशी आहे त्यामुळे त्यांनी जगातील वाईट गोष्टी घालवून टाकल्या. मला वाटते की आजपासून तुम्ही कधी कशाप्रकारची चोरी करू नका आणि कोणाला करण्यास मदत करू नका. या देशात आजकाल जातीपातीवरून भांडणे चालू असतात. आपल्याला आपला देश वाचवायचा आहे की बुडवायचा आहे? आपल्यावर आता खूप जबाबदारी आली आहे. या कलियुगाला बदलावयाचे आहे. हजारोंमध्ये तुम्ही पार झाला आहात. इतके लोक दुनियात कोठे पार झालेले नाहीत. म्हणून मी सारखे सारखे हेच म्हणते की तुम्ही खरेपणाच्या पाठीशी रहा. मी स्वतः तुमच्या पाठीशी आहे.परमेश्वर तुमच्या पाठीशी आहे. आज हा निश्चय करा की आम्ही कसलीच चोरी चालू देणार नाही, जिथे माहित होईल तिथे आम्ही भांडू.(आत्मसाक्षात्काराच्या) प्रकाशाचा वापर करा. हिम्मत धरा. हिम्मतीने काम करा.या देशातील ज्या वाईट गोष्टी आढळतील त्या नष्ट करा. प्रामाणिकपणा तुमच्यात नसेल, तर तुम्हाला परमेश्वर मदत करणार नाही. पैसे मिळवणे हे कार्य परमेश्वर मिळवणे नसून धर्माने वागणे म्हणजे परमेश्वराला प्राप्त करणे आहे.एवढ्या संख्येने सहजयोगी दुनियेत कुठेही नाहीत. सहजयोगी कधी वाईट काम करीत नाहीत. मी यासाठी सांगते की इथले वातावरण खराब आहे. फार बदनाम झालेत लोक. आपल्याकडे सर्वकाही आहे. खायला,प्यायला कपडे-लत्ते, सिनेमा पहा, पैसा आहे. पण पैसा कमवण्याचे व्यसन प्रथम गेले पाहिजे.

मला खात्री आहे की मी आज आपल्याला सांगितलेल्या गोष्टी तुम्ही लक्षात ठेवाल आणि आजपासून सर्वजण शपथ घ्या की आजपासून आम्ही बेईमानी करणार नाही आणि बेईमानी करणाऱ्यांना विरोध करू. आपल्या देशाला आज सर्वात जास्त इमानदारीने वागणाऱ्यांची आवश्यकता आहे. त्यापेक्षा कोणतीही मोठी गोष्ट नाही. आपली आईमध्ये प्रामाणिकपणा ही आहे. दहा शर्ट ऐवजी एक घेतला तर त्यामुळे काय बिघडणार आहे? हे बायकांना देखील सांगा. आजचे भाषण वेगळे आहे, निराळे आहे. तुम्हा सर्वांना आवडले हे फार चांगले झाले. सर्वांना धन्यवाद.

● ● ●

२४ डिसेंबर २००७, प्रतिष्ठान - पुणे








# २५ डिसेंबर २००७, निर्मल नगरी, पुणे











## २५ डिसेंबर २००७, निर्मल नगरी, पुणे











# ३१ डिसेंबर २००७, प्रतिष्ठान - पुणे















# ख्रिसमस पूजा २००७ निर्मल नगरी, पुणे (वृत्तांत)



यावर्षी निर्मलनगरीत साधारण २-३ महिन्यांपासूनच पूजेची तयारी सुरू झाली होती. मोठ्या प्रमाणावर निर्मलनगरीत सुधारणा व कामे सुरू झाली होती. त्यामध्ये मुख्य पेंडॉलमध्ये बसण्याची जागा कॉंक्रीटची करण्याची तसेच विदेशी सहजयोग्यांना बंदीस्त जागेत राहण्यासाठी कायमस्वरुपी शेड उभे करण्याचे काम जोरात सुरु होते. तसेच मुख्य रस्त्यापासून निर्मलनगरी पर्यंतचा रस्ता डांबरी करण्याचे काम अहोरात्र सुरू होते. साधारण एक महिन्यापासूनच स्टेज डेकोरेशनचे कलकत्यावरुन आलेले ३०-४० कलाकार रात्रदिवस काम करीत होते. तसेच अतिशय सुंदर अशी सर्व चक्रांची मंदीरे उभारण्यात आली होती. स्टेजसमोर तीन मार्ग तयार करण्यात आले होते त्यांना इडा, पिंगला व सुषुम्ना नावे दिली होती. सुषुम्ना मार्गाच्या दोन्ही बाजूला लाल दगडात कोरीव काम केलेला कठडा लावला होता. सर्व कमिटी प्रमुखांच्या सतत मिटिंग होत होत्या. साधारण २१ डिसेंबर पासूनच सर्व कार्यकर्ते निर्मलनगरीत मुक्कामी आले होते.

## २४ डिसेंबर २००७

आजच्या पहिल्या दिवसाच्या कार्यक्रमाची सुरवात सकाळी ६.३० च्या सुमारास सामूहिक ध्यानाने झाली. त्यानंतर सर्वजण ९.३० च्या सुमारास हवनासाठी एकत्र जमले. स्टेजसमोरील स्टेजसमोरील श्रीमाताजींच्या फोटोसमोरच्या बाजूला हवनकुंड तयार करण्यात आले होते. हवनासाठी श्री राजेंद्र पुगालीया आणि काही कमिटी प्रमुख हवनाच्या भोवताली बसले होते. सुरवातीला सामूहिक बंधन त्यानंतर ५ मिनीटे ध्यान झाले, तीन महामंत्र त्यानंतर, गाईये गणपती, बोलो आदिशक्ती श्रीमाताजी, या भजनाने झाली.

हवनाच्या सुरवातीला हवनकुडात फुले वाहण्यात आली त्यावेळी श्री गणेश मंत्र, अथर्वशीर्ष झाले. त्यानंतर हवनकुंड अग्नीदेवतेचा मंत्र उच्चारत असताना प्रज्वलीत करण्यात आले. श्रीमाताजींची १०८ नावे घेण्यात आली. शेवटी सर्वांसाठी सामूहिक आहुती झाली. त्यानंतर पुर्णाहुतीचा मंत्र झाल्यानंतर सर्वांनी ५ मिनीटे ध्यान केले. त्यानंतर आरती झाली. त्यानंतर मुखिराम आणि सहकाऱ्यांनी भजने गाऊन सर्वांना नाचवले.

संध्याकाळी ५.४० च्या सुमारास मॅरेज कमिटी प्रमुख श्री नलगिरकर यांचे स्टेजवर आगमन झाले. त्यावेळी सुरवातीला तीन महामंत्र आणि गणेशमंत्र सर्वांनी म्हटला त्यानंतर ज्यांची लग्ने ठरली आहेत अशा ग्रुप पैकी ३०-३० मुला-मुलींना पुढे बोलावण्यात आले. त्यानंतर प्रत्येक जोडी जाहीर करू न त्यांना स्टेजवर श्रीमाताजींच्या निराकार दर्शनासाठी बोलावण्यात आले.

संध्याकाळी ७.०० च्या सुमारास संध्याकाळच्या कार्यक्रमाची सुरवात तीन मुलींनी तीन महामंत्रांवर नृत्य करून केली. त्यानंतर श्री राजीवकुमार व श्री पुगालिया यांनी श्रीमाताजींच्या निराकार फोटोला हार अर्पण केला. त्यानंतर श्री दिनेश रॉय यांनी सर्वांचे स्वागत केले. श्री दीपक वर्मा यांचे स्टेजवर आगमन झाले. त्यांनी जय गणपती वंदन गणनायका, झूम झूमके नाचे हे संसार माँ, सादर केले. उज्जैन ग्रुपने नृत्य नाटिका प्रस्तुत केली. त्यामध्ये त्यांनी भ्रष्टाचार, अहंकार, व्यसन अशा सहजयोग्यांना संपवणाऱ्या गोष्टी प्रतिकात्मक रुपात सादर केल्या. त्यामध्ये सहजयोगाचे कार्य करताना सहजयोग्याचा अहंकार सारखा वाढत असतो यावर भर दिला होता. सदर वास्तववादी नाटक सर्वांना अतिशय आवडले.

८.३० च्या सुमारास सिनेसंगीतकार सहजयोगी श्री धनंजय धुमाळ आणि सहकाऱ्यांचे स्टेजवर आगमन झाले. त्यांनी गणेश

वंदन हे भजन सादर करताना त्यावर लहान मुलीने नृत्य सादर केले.त्यानंतर जग गणपती महाराज, हम आये शेरावाली, निर्मला किती वर्णावी तुझी ग स्तुती, आ माँ आ माँ, सात चक्रावर नागीण विसावली ही एकापेक्षा एक अशी ठसक्यातील भजने सादर करून सर्वांना नाचवले.

९.३० च्या सुमारास पुणे बालग्रुपचे स्टेजवर आगमन झाले. त्यांनी सुरवातीला वेगवेगळ्या ग्रुपनी नृत्य सादर केली .त्यानंतर श्रीगणेश महिमा ही नाटिका सादर करताना त्यामध्ये श्री शिव व श्री गणेशांच्या जीवनावर आधारीत अनेक प्रसंग सादर केले. सदर कार्यक्रमात साधरण १०० बाल/युवा कलाकारांनी भाग घेतला होता. अतिशय भव्य आणि नियोजनबद्ध असा हा कार्यक्रम सौ वर्षा आणि तिच्या सहकाऱ्यांनी बसविला होता.

त्यानंतर श्री संजय तलवार यांनी त्यांची जुनी व जगप्रसिद्ध भजने सादर केली. त्यानंतर इंदोरच्या मुलींनी भरत नाट्य सादर केले. शेवटी श्री मुखिराम यांनी भजने गाऊन सर्वांना रात्री उशिरापर्यंत नाचवले.

### २५ डिसेंबर २००७

आजच्या पूजेच्या दिवसाची सुरवात सकाळी सामूहिक ध्यानाने झाली.

संध्याकाळी ५.०० पासूनच सर्वजण पूजेसाठी येऊन बसले होते. सर्वत्र पूजेचे वातावरण होते. आज श्रीमाताजींच्या साकार रूपाचे दर्शन होणार असल्याने सर्वजण खुश होते. काहीजण प्रथमच श्रीमाताजींचे साकार रूपातील दर्शन घेत असल्याने लवकरात लवकर येऊन पुढे बसले होते.

साधारण ७.०० च्या सुमारास स्टेजसमोरील पडदा दूर झाला आणि सर्वांना समोर असलेल्या भव्य स्टेजचे दर्शन झाले. स्टेजवर पूजेची तयारी मांडली होती. कार्यक्रमाची सुरुवात तीन महामंत्रांनी झाली. त्यानंतर श्रीगणेश मंत्र झाला. श्री व सौ आपटे यांनी ओम नमोजी आद्या, तेरो ध्यान अती पावन, पुणे ग्रुपने माझ्या आईचा सोन्यावाणी रंग, श्री सुब्रमण्यम यांनी श्री माँ जय माँ जय निर्मल माँ, दीपक वर्मा यांनी जपले नाम हे प्यारा माँ निर्मल का, शाम जैन यांनी माँ का नाम श्री माँ का नाम, श्री संजय तलवार यांनी सीटींग इन द हार्ट , डॉ राजेश यांनी आओजी म्हारा हृदय श्रीमाताजी, श्री धनंजय धुमाळ यांनी सिंधेसायझरवर बोल वाजवले.

साधारण ९.०० च्या सुमारास स्टेजसमोरील बाजूस ढोल ताशे वाजू लागले. त्यावेळी श्रीमाताजींचे आगमन होत असल्याने सर्वजण उभे राहिले. श्रीमाताजींचे निर्मल नगरीत आगमन झाले. त्यांच्यासोबत श्रीपापाजी, सौ कल्पनादीदी व कु. तारिणी होती. सुरवातीला श्रीमाताजीं निर्मलनगरीत नव्याने स्थापन करण्यात आलेल्या चक्रांच्या मंदिरांचे त्यांच्या हस्ते उद्‌घाटन करण्यासाठी आज्ञा चक्राच्या मंदिराजवळ आल्या. त्यावेळी श्रीमाताजींनी फित कापून आज्ञा चक्राच्या मंदिराचे उद्‌घाटन केले. त्यानंतर श्रीमाताजी स्टेजच्या मागच्या बाजूला असलेल्या आरामकक्षात आल्या.काही क्षण विसावल्यानंतर त्या स्टेजवर असलेल्या त्यांच्या आसनावर विसावल्या. त्यावेळी सर्वजण आगत-स्वागत गीत म्हणत होते. त्यानंतर समोरचा पडदा दूर झाला आणि सर्व जगभरातून आलेल्या सहजयोग्यांना श्रीमाताजींचे दर्शन मिळाले.

त्यानंतर श्रीमाताजींच्या साकार पूजेसाठी जमलेल्या लहान मुलांना स्टेजवर बोलवण्यात आले. सर्व मुले स्टेजवर येताना डोक्यावर लाल रंगाची टोपी घालून ४-४ च्या ग्रुपने येत होती. आलेला प्रत्येकजण श्रीमाताजींच्या चरणावर फुले अर्पण करून नमस्कार करून शिस्तीत परत जात होता. त्यानंतर श्रीमाताजींची ओटी भरण्यासाठी व शृंगार करण्यासाठी सात महिलांनी स्टेजवर श्रीमाताजींसमोर साडी धरली. त्यानंतर सौ कल्पनादीदी व सौ अन्नूदीदीयांनी श्रीमाताजींच्या चरणावर लाल रंगाने स्वस्तिक काढले. श्रीमाताजींचा शृंगार करण्यात आला. त्यांना पूजेचे अलंकार घालण्यात आले. त्यानंतर श्रीमाताजींसमोरील साडी व ओटी श्रीमाताजींना अर्पण करण्यात आली. त्यावेळी पूजेतील गाणी, बिनती सुनिये, श्रीगणेश अथर्वशीर्ष, हेमजा सुतम भजे, जगी तारक जन्मा आला, जागो सबेरा, ही भजने झाली. श्रीमाताजींच्या समोरचा साडीचा पडदा दूर झाला आणि सर्वांना श्रीमाताजींच्या साकार रूपाचे दर्शन झाले. त्यानंतर विश्ववंदीता हे भजन झाले.

त्यानंतर जगभरातील कोऑर्डिनेटरांनी श्रीमाताजींची साकार स्वरूपातील आरती केली. त्यानंतर श्रीमाताजींना वर्ल्ड फाऊंडेशनतर्फे मोठा बुके देण्यात आला. संपूर्ण भारतातर्फे श्रीमाताजींना श्रीगणेशांची सुंदर मूर्ती प्रेझेंट देण्यात आली. त्यानंतर

श्रीमाताजींच्या समोर महाप्रसाद दाखविण्यात आला. फुटाणे, पेढे, कुंकू , तिर्थ श्रीमाताजींच्या हस्ते व्हायब्रेट करण्यात आले. त्यानंतर श्रीमाताजींच्या बाजूला श्रीपापाजींसाठी व सौ कल्पनादीदींसाठी बसण्यासाठी कोच मांडण्यात आले. श्रीमाताजींसमोर क्रॉसच्या आकाराचा मोठा केक आणण्यात आला. श्रीमाताजींनी श्रीपापाजी,सौ कल्पनादीदी, कु तारिणी आणि जगभरातून आलेल्या सर्व सहजयोग्यांच्या समक्ष प्रचंड टाळ्यांच्या गजरात केक कापला. त्यानंतर श्रीपापाजींनी श्रीमाताजींना केक भरवला.श्रीपापाजींनी छोटेसे भाषण केले. मेरी माता का करम है ही कव्वाली श्रीमाताजींसमोर झाली. त्यावेळी सर्वजण श्रीमाताजींसमोर तल्लीन होऊन नृत्य करीत होते. साधारण ११.०० च्या सुमारास श्रीमाताजी आपल्या शयनगृही परतल्या.

इकडे स्टेजसमोरील पडदा दूर करण्यात आला. आणि नुकत्याच श्रीमाताजी ज्या सिंहासनावर बसल्या होत्या त्याच्याकडे पहात चैतन्याचा आनंद घेत सर्वजण तल्लीन होऊन नाचत होते. त्यावेळी मुखिराम यांनी अनेक भजने सादर केली. सर्वांसाठी महाप्रसादाची व्यवस्था केली होती.त्यानंतर बराचवेळ रात्री उशिरापर्यंत पेंडॉलमध्ये सर्वजण नाचत होते.

### २६ डिसेंबर २००७

आजच्या दिवसाची सुरवात सकाळी सामूहिक ध्यानाने झाली. साधारण १०.०० च्या सुमारास दुसरे सत्र सुरू झाले. त्याचे सूत्रसंचालन श्री प्रशांत दिवेकर करीत होते. त्यांवेळी सुरवातीला त्या चक्राची माहिती नंतर भजन नंतर श्रीमाताजींचे संबंधित चक्राविषयी भाषण शेवटी चक्राच्या रागावर ध्यान अशा प्रकारे कार्यक्रमाची आखणी केली होती. मूलाधार चक्राविषयी श्री सदाशिव शुक्ला यांनी माहिति दिली, स्वाधिष्ठान चक्राविषयी मध्यप्रदेशचे श्री कुलकर्णी यांनी माहिति दिली, नाभी चक्राविषयी हरियानाचे श्री जसपालसिंग यांनी माहिति दिली., त्यानंतर हृदय चक्राविषयी अमरावतीचे डॉ बुधवाणी, विशुद्धी चक्राविषयी दिल्लीचे डॉ निगम, आज्ञा चक्राविषयी इंदोरचे अनिल तिवारी शेवटी सहस्रार चक्राविषयी श्री निंबाळकर पुणे यांनी माहिती सांगितली. त्यावेळी प्रत्येक चक्राची माहिती सांगून झाल्यानंतर त्या देवतेची प्रथम नमो गिरिजा सुत, ज्ञानदायिनी हंस वाहिनी, लक्ष्मी आली तिची कृपा आम्हावर झाली, दुर्गती हारिणी दुर्गे अंबे, निर्मला श्रीधरा, नमो नमो मारिया, मोरा मन लागो माँ चरणोंमे ही भजने झाली. सकाळी १०.वा सुरू झालेला हा कार्यक्रम मध्ये मध्यंतर घेऊन साधारण ५.०० वाजता संपला. सर्वांना चक्रांची माहिति, राग, श्रीमाताजींची त्या त्या चक्राविषयी मिळालेली माहिती यामुळे सर्वजण आनंदी झाले होते.

संध्याकाळच्या कार्यक्रमाची सुरुवात पुणे म्युझिक ग्रुप व श्री अरुण आपटे यांनी महामंत्रांनी केली. त्यानंतर रचिल्या रुषीमुनींनी हे भजन झाले. त्यानंतर एनजीओ ग्रुपचे स्टेजवर आगमन झाले. त्यांनी हर सास मे है सुमरण तेरा, चरणो मे माँ तेरे चरणो मे ही भजने सादर केली. शेवटी गोंधळाच्या गाण्यावर नृत्य सादर केले. साधारण ७.०० च्या सुमारास धर्मशाळेच्या मुलांचे स्टेजवर आगमन झाले. त्यावेळी गणेश वंदना नृत्य करून सादर केली. त्यानंतर १२ तबलावादकांनी एका तालात तबल्यावर ताल वाजवून सर्वांची वाहवा मिळविली. युवा मुलींनी कृष्ण लीला भरतनाट्य सादर केले. श्रीमाताजींनी नुकत्याच दिल्लीत केलेल्या भ्रष्टाचारावरच्या भाषणावर आधारीत नाटीका सादर केली. त्यामध्ये जगातील भ्रष्टाचार श्रीमाताजींच्या आशीर्वादाने नष्ट केला जात आहे असा आशय होता. सदर नाटीका वास्तवाला धरून असल्याने खूपच प्रभावी झाली.

८.०० च्या सुमारास ठाणे कलेक्टीव्हीटीने महाराष्ट्राची लोकधारा हा कार्यक्रम सादर केला. त्यामध्ये लहान मुलांपासून ते वयोवृद्धांपर्यंत सर्व कलाकारांनी भाग घेतला होता. त्यामध्ये अनेक नृत्याचे प्रकार दाखविताना, श्री शिवाजी महाराज,तसेच देवीची रूपे सादर करुन सर्वांची वाहवा मिळविली. शेवटी श्रीमाताजींचा फोटो असलेल्या पालखीचा भव्य सोहळा स्टेजवर दाखविण्यात आला.

९.०० च्या सुमारास वैतरणा ॲकॅडमीचे स्टेजवर आगमन झाले. त्यांनी राग अहिर भैरव सादर केला. शांताकारम हा श्लोक सादर केला. राग भैरव मध्ये तराणा सादर केला.शेवटी कुचिपुडी नृत्य सादर केले. त्यानंतर युक्रेनच्या कलेक्टीव्हीटीने अतिशय सुंदर नृत्य सादर करून सर्वांची वाहवा मिळविली. श्री शाम जैन यांचे स्टेजवर आगमन झाले. त्यांनी सुरवातीला अनेक रूपे दाखवी मानव या रंग भुमीवरी, ब्रह्म शोधिले ब्रह्मांड मिळाले ही भजने सादर केली.

११.०० च्या सुमारास पुणे ग्रुपचे स्टेजवर आगमन झाले.

त्यामध्ये ५ वर्षापासून ते ७० वर्ष वय असलेल्या सहजयोगी कलाकारांनी भाग घेतला होता. त्यांनी सुरवातीला हे गणराया, आज माझ्या माऊलीचे रूप म्या पाहिले, शेवटी चलत मुसाफिर हे भजन सादर करताना प्रत्येक कडवे हे वेगवेगळ्या वयाच्या ग्रुपने गाऊन सर्वांची वाहवा मिळविली. त्यानंतर राजस्थानच्या मुलांनी नाटीका सादर केली.

उद्या लग्नाचा कार्यक्रम असल्याने आज पेंडॉलमध्ये सर्वत्र मेहेंदी काढण्याचा कार्यक्रम रात्री उशिरापर्यंत चालला होता.

२७ डिसेंबर २००७

आजच्या लग्नाच्या दिवसाची सुरवात सकाळी सामूहिक ध्यानाने झाली. त्यानंतर ११.०० च्या सुमारास हळदीच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. त्यामध्ये सर्व नववर-वधूबरोबरच सर्वांनी हळदी खेळण्याचा आनंद घेतला. त्यानंतर नाशिकचे श्री शुक्ला यांच्या मार्गदर्शनात संध्याकाळच्या लग्नाची तयारी सुरू झाली. त्यात अंतरपाट तयार करणे, हवनकुंड तयार करणे प्रत्येक हवन कुंडासमोर नंबर देणे, प्रत्येक नवरदेव व नववधूला नंबराचा बॅच देणे. हवन सामग्री कुंडासमोर ठेवणे, अक्षता तयार करणे, हार मांडणे इत्यादी तयारी सुरू होती.

संध्याकाळी ७.०० च्या सुमारास लग्नविधीकार्यक्रमाची सुरवात तीन महामंत्रांनी झाली.लग्नाची तयारी अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने श्री नलगिरकर यांच्या मार्गदर्शनात चालू होती. मुख्य पेंडॉलमध्ये पुढच्या बाजूला क्रमांकानुसार सर्व नववधूंना बसविण्यात येत होते. बाहेरच्या बाजूला सर्व नवरदेवांना एका पेंडॉलमध्ये अनुक्रमांकानुसार बसविण्यात आले. प्रत्येकाने श्रीमाताजींच्या निराकार चरणाची पूजा केली. नंतर मिरवणुकीने सर्वजण मुख्य पेंडॉलकडे निघाले. मुख्यपेंडॉलमध्ये श्रीमाताजींच्या चरणाची पूजा करून सर्व नववधुंनी गौरीपूजन केले. त्यावेळी मेरे सरपे हाथ रखके,ऐसा दो हमे ज्ञान, मैया आदि मिला दे परम प्यारा ही भजने झाली. नंतर सिनेसंगीतकार श्री धुमाळ त्यांच्या सिंथेसायझरवर सनईची मंगल धुन वाजवित होते. गौरीपूजन झाले. नंतर श्रीमाताजींनी लग्नाच्या वेळी नववधूंना दिलेल्या उपदेशाची सीडी पडद्यावर सर्वांना दाखविण्यात आली. त्यानंतर सर्व नववधुंना त्यांच्या क्रमांकानुसार उभे करण्यात आले. इकडे आलेल्या प्रत्येक नवरदेवास त्याच्या क्रमांकावर उभे करण्यात आले. मध्ये अंतरपाट धरण्यात आला. त्यानंतर सहजयोगाच्या मंगलाष्टका म्हणण्यात आल्या.त्यानंतर दोघांनी एकमेकांना हार घातले.

सर्व जोडप्यांना हवनकुंडाजवळ बसविण्यात आले.त्यावेळी प्रथम विश्वधर्म स्विकारला असल्याची त्यानुसार वागण्याची सामूहिक शपथ, कन्यादान, मंगळसूत्र बांधणे, सप्तपदी, गाठ बांधणे, इत्यादी लग्नाचे विधी पार पडले. त्यानंतर सर्व जोडप्यांना पुढे बसविण्यात आले. त्यांनी एकमेकांना घास भरविण्याचा कार्यक्रम झाला. त्यानंतर सर्व जोडप्यांना प्रतिष्ठानमध्ये श्रीमाताजींच्या आशीर्वादासाठी नेण्यात आले.

प्रतिष्ठानच्या मोठ्या हॉलमध्ये सर्व नववर-वधूंना बसविण्यात आले होते. समोर श्रीमाताजींचे आसन मांडण्यात आले होते. बाजूला पुणे म्युझिक ग्रुप व मुखिराम यांचा ग्रुप बसला होता. साधारण १०.०० च्या सुमारास श्रीपापाजी व सौ कल्पनादीदी व कु तारिणीचे हॉलमध्ये आगमन झाले. त्यावेळी श्रीपापाजींनी सांगितले की श्रीमाताजी आराम करीत आहेत. त्यांनी सर्वांना आशीर्वाद दिले आहेत. त्यानंतर मेरी माता का करम है मेरी माता का करम है ही कव्वाली झाली. त्यानंतर श्री काकडे यांनी सिंथेसायझरवर राग वाजवून सर्वांना आनंदी केले. त्यावेळी सर्व दांपत्यांना प्रतिष्ठानमध्ये श्रीमाताजींच्या घरी लग्नाचे प्रेझेंट देण्यात आले. मुखिराम यांनी एक भजन सादर केले. त्यानंतर सर्व जोडपी परत मुख्य पेंडॉलमध्ये आली.

यावर्षीच्या ख्रिसमसपूजेचे वैशिष्टय म्हणजे स्टेजवरचे अप्रतिम केलेले डेकोरेशन. लहान लहान अशा लाखो शंखांचा उपयोग करुन एक महिन्यापासून कलकत्याच्या कलाकारांनी तयार केलेले डेकोरेशन अप्रतिम होते. श्रीमाताजींच्या स्टेजवर येण्याच्या मार्गावर दोन्ही बाजूला शंखांची रचना करून सुंदर डेकोरेशन केले होते. लग्नाच्या दिवशी श्रीमाताजींच्या येण्याच्या मार्गावर फुलांचे डेकोरेशन केले होते. तसेच कार्यक्रमाच्या मध्ये सर्वांना जागेवर चहा, मसाला दूध नाष्टयाची व्यवस्था केल्यामुळे सर्वांना शेवटपर्यंत कार्यक्रम पाहता आला. तसेच निर्मल इन्फोटेकच्या स्टॉलवर सर्वांना अनेक नवीन कॅसेट,सीडी, डिव्हीडी, पुस्तके, कॅलेंडर, तसेच श्रीमाताजींचे अनेक रूपातील दुर्मीळ फोटो उपलब्ध होते. त्यामुळे प्रत्येकाला हवे असलेले साहित्य मिळाल्याने सर्वजण खुष होते.

– जय श्रीमाताजी.

● ● ●

## नववर्षाचे आगमन पूजा, ३१ डिसेंबर २००७ - प्रतिष्ठान, पुणे

आज ३१ डिसेंबर रोजी प्रतिष्ठानमध्ये कार्यक्रमाचे आयोजन केले होते. प्रतिष्ठानमधील हॉलमध्ये साधारण ११.०० च्या सुमारास श्रीमाताजींचे व श्रीपापाजींचे आगमन झाले. त्यानंतर श्रीमाताजींची आरती झाली. त्यावेळी आगत-स्वागत गीत झाले. त्यानंतर श्रीमाताजींच्या चरणावर हार अर्पण करण्यात आला. त्यानंतर श्रीपापाजींनी सर्वांना बसण्यास सांगितले.

सुरवातीला श्रीमाताजींच्या समोर पुण्यातील वर्षाने बसविलेल्या कॅसेटवरील गाण्यावर श्रीमाताजींसमोर डान्स सादर केला. त्यानंतर बाल युवाशक्तीने कॅसेटवरील गाण्यावर समुह नाटक सादर केले. त्यामध्ये मोर, हत्ती, सारखे अनेक प्राणी असलेल्या वेषातील मुलांनी श्रीमाताजींसमोर नृत्य नाटिका सादर केली.

त्यानंतर पुणे म्युझिक ग्रुपने भजने सादर केली. त्यानंतर श्रीमाताजींच्या समोर सुंदर असा चॉकलेट रंगाचा स्टार च्या आकाराचा केक आणण्यात आला. श्रीमाताजींनी व श्रीपापाजींनी केक कापला. त्यानंतर सर्वांना केकचा प्रसाद वाटण्यात आला. त्यानंतर श्रीमाताजींच्या चरणावर उपस्थित असलेल्या परदेशी सहजयोग्यांनी भेटवस्तू अर्पण केल्या. त्यावेळी चीन देशात सहजयोगाच्या झालेल्या प्रसार व प्रचार कार्याची माहिती श्रीमाताजी व श्रीपापाजींनी घेतली. त्यानंतर पुणे युवाशक्तीनी श्रीमाताजींना फुलांचा बुके अर्पण केला. त्यानंतर श्रीमाताजींसमोर कव्वाली सादर केली.

श्रीमाताजींनी सर्वांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा बऱ्याच वेळा हाताने आशीर्वाद देत दिल्या.श्रीमाताजी आपल्या शयनकक्षात परतल्यावर इकडे हॉलमध्ये सर्वांनी भजने म्हणून नाच केला. कार्यक्रम संपला तेव्हा रात्रीचे १.०० वाजून गेले होते.

## २४ डिसेंबर २००७, पूजा - प्रतिष्ठान,पुणे

२४ डिसेंबरच्या रात्री १२ च्या सुमारास केक कापण्याच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. साधारण ११.३० च्या सुमारास श्रीमाताजी, श्रीपापाजी, सौ कल्पनादीदी व कु. तारिणीचे हॉलमध्ये आगमन झाले. श्रीमाताजी व श्रीपापाजी स्थानापन्न झाले. त्याच्या बाजूच्या कोचावर सौ कल्पनादीदी कु.तारिणीला घेऊन बसल्या होता. त्यावेळी प्रथम श्रीमाताजींच्या चरणावर श्री राजीवकुमार व श्री पुगालिया यांनी हार अर्पण केला. त्यानंतर श्रीमाताजींसमोर वैतरणा ॲकडमीचे श्री व सौ आपटे, श्री सुब्रमण्याम व विदेशी विद्यार्थी यांनी प्रथम जगी तारक जन्मा आला, त्यानंतर नमो नमो मारिया ही भजने सादर केली. त्यानंतर श्रीमाताजींच्या समोर हिरव्या रंगाचा ख्रिसमस ट्रीच्या प्रतिकृतीचा केक आणण्यात आला. श्री माताजींनी श्री पापाजींच्या मदतीने केक कापला. सर्व उपस्थितांना केकचा प्रसाद वाटण्यात आला. त्यानंतर श्रीमाताजीना श्रीपापाजींनी केक भरविला. श्रीमाताजींनी त्यांची पणती कु.तारीणी हीची पप्पी घेतली.

त्यानंतर श्रीमाताजींच्या समोर ख्रिसमसची प्रसिद्ध कॅरल गीते सादर केली. त्यानंतर श्रीमाताजींना सहजयोगाची डिरेक्टरी अर्पण केली. विदेशी सहजयोग्यांनी श्रीमाताजींना भेटवस्तू अर्पण केल्या. त्यावेळी श्रीमाताजींनी हात उंचावू न सर्वांना आशीर्वादीत केले.

## दैवी भविष्यवाणी - संदर्भ निर्मल सुरभी

''मी तीच आहे जिने वेळोवेळी जन्म घेतला आहे.परंतु आता मी पूर्ण स्वरुपात आणि पूर्ण आले आहे. मी या पृथ्वीवर मानवाच्या उद्धारासाठी, मानवाच्या मुक्तीसाठी आलेले नसून, मी तर मानवाला स्वर्गाचे साम्राज्य, आनंद परमानंद प्रदान करायला आले आहे. आपला परमपिता, (ईश्वर, अल्लाह,सदाशिव)ज्याचा वर्षाव आपल्यावर करण्याची इच्छा करतात.''

परमपूज्य श्रीमाताजी यु.के. २.१२.१९७९

## लाल बहादूर शास्त्री - एक सत्यमय राजकारणी आयुष्य ,लेखक- सर सी.पी. श्रीवास्तवसाहेब. उर्दू अनुवादीत पुस्तकाचा प्रकाशन समारंभ - १७ नोव्हेंबर २००७, न्यु दिल्ली

माजी पंतप्रधान श्री लाल बहादूर शास्त्री यांच्या जीवनावर आधारीत सर सी.पी. साहेबांनी लिहिलेल्या पुस्तकाचा उर्दू भाषेत अनुवाद प्रो. श्री अब्दुल हक यांनी केला आहे. सदर अनुवादित पुस्तकाच्या प्रकाशनाचा समारंभ भारताचे उपराष्ट्रपती श्री म. हमिद अन्सारी यांच्या हस्ते पार पडला. कार्यक्रमाचे आयोजन सहजयोग ट्रस्ट दिल्ली यांनी दिल्लीच्या अशोक हॅाटेलच्या हॅालमधे केले होते.

साधारण १००० पेक्षाही जास्त लोक हॅालमध्ये उपस्थित होते. सदर कार्यक्रमासाठी प्रवेशद्वार सर्वत्र दिव्यांनी प्रकाशित केले होते. सुमारे २.१५ च्या सुमारास श्री माताजी, श्री सी.पी.साहेब (श्री पापाजी) तसेच त्यांच्या कुटुंबीयांचे आगमन झाले. त्यावेळी स्वागत कक्षात श्रीगणेश मूर्ती मांडली होती. तसेच एक राधा-कृष्णाचे सुंदर असे चित्र लावले होते. श्रीमाताजींच्या आगमनाच्या वेळी सदर दोन्ही उजळून निघाले होते. श्रीमाताजींनी सदर प्रतिमेसमोर फुले वाहून पूजा केली. त्यानंतर श्रीमाताजी व त्यांचे कुटुंबीय हे त्यांच्यासाठी सजविलेल्या खोलीमध्ये विश्रांतीसाठी गेले.

इकडे मुख्य हॅालमध्ये साधारण ४.०० पर्यंत सर्व निमंत्रित व सहजयोगी आपापल्या जागेवर बसले होते. संपूर्ण हॅाल भरला होता. पुढच्या बाजूला पत्रकारांसाठी बसण्याची व्यवस्था केली होती. हॅालमध्ये दोन मोठे स्क्रिन लावले होते. श्रीमाताजी व कुटुंबीयांचे साधारण ४.१५ च्या सुमारास आगमन झाले. त्यावेळी हॅालमध्ये असलेले सर्व कॅमेरे श्रीमाताजींच्या प्रत्येक हालचालीचा क्षण टिपण्याचे व ते स्क्रिनवर दाखविण्याचे काम करू लागले.

सुरवातीला स्टेजवरील सर्व निमंत्रितांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. निमंत्रितांमध्ये उप. राष्ट्रपती श्री म. हमीद अन्सारी,. डॉ. ए. आर. किदवास, लालबहादूर शास्त्रींचे दोन्ही चिरंजीव श्री अनिल शास्त्री व श्री सुनिल शास्त्री, हरियानाचे राज्यपाल प्रमुख होते.

श्री सी.पी.साहेबांनी त्यांच्या सुरवातीच्या भाषणात या कार्यक्रमास उपस्थित राहिल्याबद्दल श्री हमिद अन्सारी तसेच पुस्तकाचे भाषांतर केलेले प्रो. अब्दूल हाक, हरीयानाचे राज्यपाल तसेच लालबहादूर शास्त्रींच्या दोन्ही मुलांचे स्वागत केले. त्यावेळी श्री पापाजींची त्यांच्या आयुष्यातील लाल बहादूर शास्त्रींच्या सोबतीचे काही आनंदमय क्षण आठवून सर्वांना सांगितले. त्यावेळी त्यांनी शास्त्रींच्या प्रामाणिकपणा व न नमणाऱ्या स्वभावाची काही उदाहरणे दिली. त्यांनी सांगितले की, शास्त्रीजींच्या ऐक्य व सर्वधर्म समानता या गुणांमुळे मी प्रभावित झालो होतो. त्यानंतर श्री पापाजींनी सांगितले की, <u>शास्त्रीजींच्या या गुणांमुळेच त्यांनी पाकिस्तानच्या काही पुढाऱ्यांबरोबर चांगले संबंध मी प्रस्थापित करू शकलो.</u> श्रीपापाजींच्या भाषणाच्या प्रत्येक वाक्याबरोबर प्रचंड टाळ्यांचा कडकडाट होत होता. भाषणाच्या शेवटी श्री पापाजींनी त्यांच्या कार्याचे संपूर्ण प्रेरणा व श्रेय श्रीमाताजींचे असल्याचे सांगितले.यांच्या भाषणानंतर संपूर्ण हॅाल उभा राहून टाळ्यांच्या गजरात श्रीपापाजींच्या भाषणाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

त्यानंतर हरियानाचे राज्यपाल श्री ए.आर. कडवायी यांनी त्यांच्या भाषणात श्री शास्त्रींबद्दल आणखी काही माहिती सांगितली. त्यामध्ये शास्त्रींनी पंतप्रधान असताना त्यांच्या असलेल्या उच्च विचारांचे त्यांनी प्रसंग सांगून त्यानुसार कौतुक केले. त्यानंतर उपराष्ट्रपती श्री हमिद अन्सारी यांनी श्री सी.पी.साहेबाना प्रथम धन्यवाद दिले. त्यानंतर श्री शास्त्रींनी केलेल्या कार्याबद्दल त्यांचे खूप कौतुक केले. तसेच पुस्तकाचा उर्दूत अनुवाद केलेले श्री अब्दुल हाक यांचे आभार मानले. त्यावेळी ते म्हणाले की या पुस्तकाच्या वाचनामुळे सर्व मुलांना व वाचकांना विसाव्या शतकातील या महान व्यक्तिमत्त्वाची माहिती मिळेल. त्यावेळी त्यांनी श्री शास्त्री रेल्वे मंत्री असताना रेल्वेला झालेल्या अपघातामुळे स्वत:च्या मंत्रीपदाचा राजीनामा दिल्याची

घटना सर्वांना आठवण करून दिली. ते म्हणाले की, ही एक खूप मोठी व्यक्ती होती.की त्यांना आपल्या मंत्रीपदाची जाण होती त्याचबरोबर आपल्या कार्याची सुद्धा जाण होती. त्यांच्या कार्यामुळे आपल्या देशाच्या प्रगतीला खूप मोठा उपयोग झाला आहे. त्यावेळी ते म्हणाले की आजच्या सर्व राजकारण्यांनी श्री शास्त्रींच्या विचारांचा देशकार्य करताना उपयोग करावा.

त्यानंतर सर सी.पी.साहेबांनी लिहिलेल्या व प्रो. अब्दूल हाक यांनी उर्दूत भाषांतर केलेल्या पुस्तकाचे उद्घाटन भारताचे उपराष्ट्रपती श्री हमिद अन्सारी यांच्या हस्ते झाले. त्यावेळी सर्वांनी उभे राहून प्रचंड टाळ्यांच्या आवाजात आनंद व्यक्त केला. त्यानंतर पुस्तकाचे प्रकाशक श्री गलगोरिया यांनी सर्वांचे आभार मानले. त्यावेळी त्यांनी श्रीमाताजींचे, श्री पापाजींचे, प्रो. अब्दूल हाक तसेच सर्व उपस्थितांचे आभार मानले.

श्रीमाताजीनी संपूर्ण कार्यक्रम संपेपर्यंत उपस्थित राहून त्याचा आनंद घेतला. त्यामुळे सर्व कार्यक्रमात सर्वत्र चैतन्य जाणवत होते. तसेच श्रीमाताजींच्या प्रसन्न व आनंदी दर्शनाने सर्वजण अतिशय आनंदी झाले होते.

● ● ●

## दत्तजयंती पूजा
### प्रतिष्ठान, पुणे - दिनांक २३ डिसेंबर २००७

आज प्रतिष्ठानमध्ये श्रीमाताजींची दत्तजयंती निमित्त छोटीशी पूजा आयोजित केली होती. साधारण ९.०० च्या सुमारास श्रीमाताजीं निळ्या साडीत प्रसन्न मुद्रेने स्वयपाकघरात सर्वांना भेंडीची भाजी कशी करावयाची याबाबत माहिती देत होत्या.त्यामध्ये त्यांनी फोडणीबाबत सूचना सांगितल्या. त्यानंतर श्रीमाताजींचे हॉलमध्ये आगमन झाले. त्यावेळी खाली ठेवलेल्या सिंथेसायझरकडे पाहून त्यांनी श्री पुगालिया यांना , ' काय आहे ?'.असे विचारले. त्यावेळी त्यांनी सांगितले की, श्रीमाताजी हे भजनातील सिंथेसायझर वाद्य आहे. आज दत्त जयंती आहे. त्यावेळी श्रीमाताजी म्हणाल्या की, 'आम्हीच तुमचे दत्त आहोत'. त्यानंतर श्रीमाताजींनी किचनमध्ये तयार करू न घेतलेली भेंडीची भाजी फार तिखट झाली असून त्यात लिंबू पिळायला व मीठ टाकायला तसेच त्यात कांदा चिरून टाकायला सांगा अशा सूचना केल्या.

श्रीमाताजीं श्रीपापाजींसोबत हॉलमध्ये बसल्या. त्यावेळी त्यांच्यासमोर पूजेची तयारी मांडली होती. त्या सर्वांवर नजर फिरवून श्रीमाताजींसाठी आणलेल्या साडीकडे पाहून त्या म्हणाल्या की, ' आता तुम्ही दत्ताला साडी नेसवणार की काय?' त्यानंतर श्रीमाताजींच्या दत्त स्वरुपात पूजेसाठी दत्तासाठीचे वस्त्र पूजेसाठी सादर केले. त्यानंतर श्रीमाताजींच्या चरणाची पूजा केली. त्यानंतर श्रीमाताजींच्या समोर पुणे म्युझिक ग्रुपने, नानक मुहोम्मद हे गाणे सादर केले. त्यावेळी श्रीमाताजी, 'आम्हाला गाण्याचे पुस्तक द्या, त्याशिवाय आम्हाला गाण्याचे बोल कसे कळणार'? असे म्हणाल्या. त्यानंतर, ऐसा तो हमे ज्ञान, माता का करम है ही कव्वाली सादर केली. त्यावेळी श्रीमाताजींनी कव्वालीतील उर्दूचे खूप कौतुक केले. व कव्वाली तयार करणाऱ्या श्री बागडदे यांचे खूप कौतुक केले.कव्वाली सुरू असताना बाजूला सर्व युवाशक्ती नाचत होती. त्यानंतर श्रीमाताजीं मुसलमानांबद्दल बोलताना म्हणाल्या की, 'ते लोक वेडे आहेत, बेचारे आहेत. तुम्हा सर्वांना सहजयोग मिळाला आहे.त्यामुळे तुम्ही त्यांच्यावरती दया केली पाहिजे.'त्यानंतर श्रीमाताजी म्हणाल्या की, 'मला कळत नाही हे लोक सहजयोग का नाही करीत. पण ठीक आहे तुम्ही त्यांच्यावर प्रेम करा. त्यांना सहजयोग सांगा. मशीद तोडणे पूर्णत: चुकीचे आहे.'त्यानंतर श्रीमाताजींनी म्युझिक ग्रुपमधील सर्वांची नावे विचारली. त्यानंतर श्रीमाताजींनी इसामसी व ख्रिश्चन लोकांबद्दल सर्वांना सांगितले की, 'इसामसीना हवे असते तर त्यांनी सर्वांना नष्ट केले असते, पण त्यांनी स्वत:लाच नष्ट केले.' नंतर श्रीमाताजी म्हणाल्या की, 'इसामसींनी पण कुंडलिनीचा उल्लेख केला नाही. कुंडलिनीचा उल्लेख फक्त दोन गुरुंनी केला.' त्यानंतर श्रीमाताजींनी सर्वांना अनंत आशीर्वाद दिले.

● ● ●

## संक्रांत पूजा, (निराकार) - १५, जानेवारी २००८, प्रतिष्ठान पुणे

आज संक्रांतीनिमित्त प्रतिष्ठानमध्ये हॉलमध्ये पूजेचे आयोजन केले होते. पूजेची तयारी करून सर्वजण हॉलमध्ये बसले होते. साधारण ९.०० सुमारास श्री धनंजय धुमाळ यांच्या सहज क्रांती ग्रुपने बसलेल्या सहजयोग्यासमवेत भजने म्हणायला सुरवात केली. त्यात त्यांनी सुरवातीला जय गणपती महाराज, आ माँ आ तुम्हे सहजी पुकारे,दमादम मस्त कलंदर, चक्रावरी नागीण, ए आई, आले रे गणपतीराज दारी रे,मुलाधाराच्या देवा गोंधळाला या, त्यानंतर पुणे म्युझिक ग्रुपने आज बनो तुम म्हारा पावणा, मेरी आरजू है अंबे, पिंजडेवाली मुनिया, आज माझ्या माऊलीचे रुप म्या पाहिले, परत धुमाळ ग्रुपने किती वर्णावी तुझी ग स्तुती हे भजन गायले यानंतर साधारण ११.०० च्या सुमारास श्रीमाताजींच्या परवानगीने निराकार स्वरुपातील पूजा श्री पुगालिया आणि श्री पराग राजे यांनी सुरू केली.ज्या हॉलमध्ये श्रीमाताजीची निराकार पूजा सुरू होती त्याच्या मागच्याच बाजूला श्रीमाताजी साकार रुपात ध्यानात बसलेल्या होत्या. प्रथम आगत-स्वागत गीतासाठी सर्वजण उभे राहिले. त्यानंतर श्रीमाताजींच्या चरणांवर हार अर्पण केला.लहान मुलांनी श्रीमाताजींच्या चरणांवर फुले वाहिली. त्यानंतर जमलेल्या सर्वांनी श्रीमाताजींच्या चरणावर फुले वाहिली. त्यावेळी पूर्वेच्या देवा तुझे सूर्यदेव नाव,उधळीत छत किरणा,माझ्या आईचा सोन्यावाणी रंग, अंबे हमे बुलाया शेरावालीये, नाशिकचा जोगवा, शेवटी विश्ववंदीता. त्यानंतर आरतीच्या वेळी श्री पापाजींचे आगमन झाले. त्यानंतर श्री धुमाळ यांनी तुम निराकार साकार रुप में माँ अवतारी है, आ माँ आ ,त्यानंतर श्रीपापाजींनी छोटेसे भाषण केले. त्यात त्यांनी सांगितले की, ''आजचा अतिशय पवित्र दिवस आहे. आत्ता तुमच्या श्रीमाताजी ध्यानात बसल्या आहेत. '' त्यानंतर मेरी माता का करम है मेरी माता का करम है ही कव्वाली झाली. त्यानंतर सर्वांना संक्रांतीच्या तिळगूळाचा प्रसाद वाटण्यात आला. श्रीमाताजी मागच्या बाजूला ध्यानात असताना प्रतिष्ठानमध्ये त्यांच्या निराकार स्वरुपातील पूजेच्या वेळी प्रचंड प्रमाणात चैतन्य जाणवत होते.

-जय श्रीमाताजी.

## संक्रांत पूजा (साकार स्वरुपात) - प्रतिष्ठान दिनांक १७ जानेवारी २००८

प्रतिष्ठानमध्ये आज मकरसंक्रांतीनिमित्त श्रीमाताजींच्या साकार स्वरुपातील पूजेचे आयोजन केले होते. साधारण ७.४५ च्या सुमारास श्रीमाताजी व श्री पापाजींचे हॉलमध्ये आगमन झाले. आज श्रीमाताजी प्रचंड आनंदी दिसत होत्या. प्रथम श्रीमाताजींना ओवाळण्यात आले. त्यानंतर श्रीमाताजींच्या चरणावर हार अर्पण करण्यात आला. त्यावेळी पुणे म्युझिक ग्रुपने, 'आज आमच्या ध्यामी आल्या'हे भजन प्रस्तुत केले. श्री पुगालिया यांनी श्रीमाताजींच्या परवानगीने पूजेची सुरवात केली. त्यावेळी प्रथम लहान मुलांनी श्रीमाताजींच्या चरणावर फुले अर्पण केली.पूजा सुरू असताना सुरवातीला पूर्वेच्या देवा तुझे सूर्यदेव नाव, उधळीत छत किरणा, आज माझ्या माऊलीचे रुप म्या पाहिले, आदिमाया अंबाबाई त्यानंतर आरती झाली. त्यावेळी साधारण ८.३० वाजले होते.

त्यानंतर श्रीमाताजींनी छोटेसे हिंदीत भाषण केले. त्याचा संक्षिप्त आशय पुढीलप्रमाणे आहे.

*''आजच्या या संक्रांतीच्या दिवशी सर्वांनी नवीन संकल्प केले पाहिजे. सर्वांची कुडलिनी जागृत झालेली आहे.आपल्या आत एक देवीचे वास्तव्य आहे तिला खुष केले पाहिजे.आपण तीळ आणि गूळ वाटून प्रेम व्यक्त करतो.आपण एकमेकांना जर प्रेम दिले तर देवी पण खुष होऊ शकेल.आज सूर्य देव आपली जागा बदलून खाली आमच्या जवळ आले आहेत.त्यांना धन्यवाद द्यायला हवे. त्यांच्या कृपेमुळे आपल्या देशाला त्यांनी खूप काही दिलेले आहे.,त्यांना नमस्कार करा. त्यांची शक्ती ओळखली पाहिजे आणि आपल्या आत उतरवली पाहिजे. तुमच्या सर्वांच्यात चैतन्य आहे त्याचा वापर करा आणि जगाला सांगा या शक्तीबाबत.''*

त्यानंतर श्रीमाताजी व श्रीपापाजी सुमारे ९.०० च्या सुमारास परत आपल्या आरामकक्षात परतल्या. त्यानंतर पुणे म्युझिग ग्रुपने 'सब के दिल में बसी है मेरी माता निर्मला' ही कव्वाली गाऊन कार्यक्रमाची सांगता केली. ● ● ●

# नाडी ग्रंथातील भविष्यवाणी

## श्रीमाताजींनी नाडीग्रंथासंदर्भात सांगीतलेली माहिती,संदर्भ- लेख,सोलापूर १९८२,-संदर्भ -निर्मल सुरभी

या ठिकाणी त्यांनी ज्योतिष्य शास्त्र कसे खरे आहे हे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे.आणि १४००० वर्षांपूर्वी जी भविष्य वाणी केली होती ती पण सत्य होत आहे. २००० वर्षांपूर्वी कर्नाटकातल्या एका महान ज्योतिष्याने याचे वर्णन केले. हे एवढे स्पष्ट होते की, तुम्ही आश्चर्य चकित व्हाल. त्यांनी सांगितले की, एक महान योगी मीन राशीत पृथ्वीवर अवतीर्ण होईल (मेष आहे). मी मीन व मेष राशीच्या टोकावर आहे.पण हे एवढे महत्त्वाचे नाही.नंतर ते म्हणाले, हळूहळू १९६४ पासून ते १९६८ पर्यंत आपल्याला चमत्कार दिसायला लागतील.ते म्हणाले की, असे पण असू शकेल की,हे चमत्कार खूप लहान असतील.वास्तविक परिवर्तन या युगात नवीन युगातील मन्वंतर ते १९७० पासून आरंभ करतील. आणि १९८० पर्यंत याची पक्कड घट्ट होईल.ठीक आहे! या नवीन पद्धतीन नवीन युग निर्माण होईल.जुनी युगप्रणाली समाप्त होईल.ठीक आहे! या नवीन पद्धतीन नवीन युग तयार होईल.जुनी युगप्रणाली समाप्त होईल आणि तो काळ कलियुगातील असेल. म्हणून अशा प्रकारे १९७० पासून कलियुग समाप्त होईल किंवा त्याचे पतन व्हायला लागेल. सक्रीय-देवत्वाचे युग कृत युग आरंभ होईल.त्यावेळी सूर्य नावीन्याने राज्य करील.पृथ्वीचा आस कमी होत जाईल.आणि पृथ्वीची गतीदेखील हळूहळू कमी होत जाईल.त्यावेळी एक महान योगी जन्म घेईल, जो संपूर्ण परब्रह्म असेल. अर्थात महाकाली आणि महालक्ष्मीच्या सर्व शक्तीने परीपूर्ण सर्व शक्तीने ! यापूर्वी लोक भक्ती आणि ज्ञान अर्थात अध्ययन व पातंजले योगाचे आचरण करीत असत. नंतर मोक्ष प्राप्त करीत असत परंतु नवीन पद्धतीने एक महायोगी आपला चक्रे पवित्र शक्तीने जागृत करेल व त्यामुळे कुंडलिनी शक्ती जागृत होईल आणि सर्व प्रकाशित होतील. ह्या महायोगाच्या नवीन पद्धतीमुळे आपण आपल्यातील बदल स्वत:च्या डोळ्यांनी बघू शकाल आणि आपल्या आयुष्यात,याच शरीरात आत्मसाक्षात्काराची प्राप्ती करून घ्याल आणि आपल्याला आत्मसाक्षात्काराच्या आनंदाची प्राप्ती करुन घ्याल (प्रश्न : श्रीमाताजी त्यांचे नाव काय होते?) त्यांचे नाव होते भुजेंद्र, भुजेंद्र काका त्यांचे नाव भोते काका भुजेंद्र आचार्य काका भुजेंद्र सत्वाचार्य.

आपल्याला ह्या शरीराचा त्याग करायचा नाही. बऱ्याच लोकांनी, महान संतांनी जिवीत अवस्थेत शरीराचा त्याग केला, गुहेमध्ये स्वत:ला बंद करून घेतले आणि मृत्युला प्राप्त केले. परंतु या नवीन पद्धतीप्रमाणे हे करणे आवश्यक नाही. त्यासाठी मृत्युला सामोरे जाण्याची गरज नाही. अर्थात आपण आपल्या आत्म्याला प्राप्त कराल, आत्मसाक्षात्कारी आत्मे, आत्मसाक्षात्कारी संत, या नवीन योगाने ब्रह्मानंद प्राप्त करतील. त्यांना समाधी घेण्याची जरूर पडणार नाही. अशा प्रकारचे हे काहीही न करता ते आत्मसाक्षात्कार मिळवतील आणि ब्रह्माचा आनंद घेतील, सहज समाधी. त्यांच्यानुसार ही सहजसमाधी आहे.... सर्वप्रथम लाखातून एखादा आत्मसाक्षात्कार प्राप्त करेल. आपण आपली स्थिती समजून घेतली पाहिजे की कशा प्रकारे आणि आपले चित्त व्यर्थ गोष्टीवर केंद्रित न करता आपण समजून घेतले पाहिजे की आपण लाखात एक आहोत. माझा पती, माझी पत्नी, माझी मुले इ. व्यर्थ गोष्टीवर आपण आपले चित्त नेतो. या ठिकाणी सांगितले आहे की लाखातून एखादा निवडला जाईल, हे आपल्याला समजेल का? तेव्हा या योगामुळे (सहजयोग) पूर्ण मानवजातीला मृत्यू आणि विनाशापासून सुटका मिळू शकेल. आपल्याला विवाहित राहून सर्वसामान्य जीवनाचे मार्गदर्शक होता येईल. अविवाहित असून देखील एका सामान्य गृहस्थाप्रमाणे राहता येईल. अन्यथा आपण ही योगसिद्धी प्राप्त करू शकणार नाही. खूप मोठे संत आणि साधुबाबा किंवा गुरू किंवा काहीतरी मोठे होऊन आपण याला मिळवू शकत नाही. विवाहीत किंवा अविवाहीत असला तरी आपल्याला संसारात यावे लागेल, संसारी म्हणजे सर्व अडचणींना तोंड देत या भूतलावर रहाणारे सर्वसामान्य.

तेव्हा या योगाने तुमचे सर्व आजार एवढे पटकन नष्ट होतील की तुम्हाला हॉस्पिटलची आवश्यकता भासणार नाही.

सुरवातीला हे महान योगी, तुम्ही लोक सुद्धा फक्त स्पर्श करुन लोकांचे आजार बरे करू शकाल, हे सत्य आहे. अर्धनटेश्वर शिवासारखी अवस्था होईल. मानवाची वृद्धावस्था समाप्त

होईल.त्याचे शरीर जसे आहे तसेच राहील आणि दैवी शरीराची प्राप्ती होईल. म्हणून शारीरिक सुखाची फार काळजी करू नका.ठिक आहे? नंतर असे होऊ शकेल.तुमच्यातील काही लोक जर तुमची इच्छा असेल तर हवेत पण उडू शकतील(हास्य)ते अत्यंत सूक्ष्म होऊन दुसऱ्यांच्या शरीरात , त्यांना रोगमुक्त करण्यासाठी प्रवेश करू शकतील. तुम्ही तर आता देखील ते करीत आहात. अग्नि आणि शस्त्रांचा त्यांच्यावर काहीही परिणाम होणार नाही. ह्या सुक्ष्म गोष्टी तुम्ही तुमच्या डोळ्यांनी देखील पाहू शकाल.तुम्ही त्यांना पाहू शकाल, हे केवळ भारतातच नाही तर, पूर्ण विश्वात घडून येईल.भारत हा महान पुण्यवान देश आहे.त्यामुळे ही शक्ती भारताचे रक्षण करेल आणि ह्या देशाची हळूहळू प्रगती होईल.

ते म्हणाले की तिसरे महायुद्ध .... हे लोक तिसरे महायुद्ध करतील आणि त्यांना त्यांचे दुष्परिणाम भोगावे लागतील. त्यानंतर ह्या महान अवताराच्या हस्तक्षेपामुळे सर्वदेश सामूहिक ऐक्याला समजून घेतील. युद्ध महाभयंकर असते याची त्यांना जाणीव होईल. एक खूप मोठ्या शहरात (मला माहीत नाही कुठले ते) सर्व देशाची परिषद होईल.आणि त्या ठिकाणी राजनितिज्ञ नसतील, परंतु योगी त्यांना मार्गदर्शन करतील योगी...त्यांनी तुम्हाला सर्वबाबतीत योगी म्हटले आहे. असेही असू शकते की चीन बरोबर अलीकडे जे युद्ध झाले ते तिसरे विश्वयुद्ध होते. ते म्हणतात की चीनच्या आक्रमक धोरणामुळे आणि तिसऱ्या विश्वयुद्धामुळे आपल्याला खूप समस्या झेलाव्या लागतील. परंतु प्रार्थनेद्वारा आपण सर्व देशांना एका सुत्रात बांधू शकू. विज्ञानाच्या अगदी नवीन शोधांमुळे दैवी ज्ञान आणि विज्ञान एक होतील. विज्ञानाच्या सहाय्याने परमात्मा आणि आत्मा याचे अस्तित्व प्रस्थापित करू शकू.

अशा प्रकारे विज्ञान आणि आत्मा किंवा दैवी ज्ञान यामधे कुठलेही मतभेद राहणार नाहीत. त्यांच्यात एकमेकांना अनुकुलता, तसेच स्नेहसंबंध अता देखील होत आहेत. कारण माझ्या फोटोग्राफमुळे लोकांना चैतन्यलहरींची प्राप्ती होते, हे विज्ञान आहे. दूरदर्शनवर मंत्र इ.द्वारा.वैज्ञानिक पद्धतीने जर आपण लोकांना रोगमुक्त कराल तेव्हा विज्ञानाचा त्या हेतूसाठी उपयोग करीत आहात, आपण सिद्ध करू शकता की या गोष्टी चुंबकियशक्ती द्वारा, आवाजाद्वारा पाठवू शकतात.तेव्हा ते म्हणाले की अज्ञान आणि मायेमुळे सामूहक चेतना, ब्रह्मऐक्य बनण्यासाठी, ब्रह्माचा अनुभव करण्यासाठी योग्यांना खूप कष्ट झेलावे लागेल. त्यांना खूप तपश्चर्या करावी लागली.जी खूपच कठीण होती. परंतु आता हे सहज होणार आहे. हा शब्द आहे. सहज, सह + ज प्राप्त झालेला=सहज आणि ब्रह्माच्या प्राप्तीसाठी आपल्याला कुठलाही त्याग करावा लागणार नाही.

नवीन युगात जेव्हा विभिन्न देशात योग पद्धतीचे प्रगटीकरण होईल तेव्हा प्रशासन त्याच लोकांद्वारा चालवले जाईल. ज्याच्यात योगशक्ती आहे. योगातील गहनता आणि गुण हीच निर्णायक तत्त्वे असतील.त्यांच्या इच्छा आणि गरजा पूर्ण होतील, असा समाज तयार करतील व लोकांना संपत्ती साठविण्याची गरज पडणार नाही. गरिबी आणि रोग पूर्ण नाहीसे होतील आणि समाज निरोगी व शांतता प्रिय होईल.

त्यांनी एक अमेरिकन महिला जॅकलीन मेई हिचे नाव दिले आहे.ह्या स्त्रीने तिच्या भविष्यवाणीत म्हटले आहे की भारतात एका महान व्यक्तीचा जन्म होईल, साधारण १९२४ च्या दरम्यान होईल. माझा जन्म १९२३ ला झाला, अंदाज बरोबर आहे.

परंतु चेयरोने म्हटले आहे १९८० सालापर्यंत एका नवीन अवतरणाने नवीन युगाचा प्रारंभ होईल, १० वर्षाचा फरक आहे.

एयिस बेले नावाची महिला मला वाटते, तिला अतिचेतना अवस्था प्राप्त झाल्यामुळे त्या अतिचेतना अवस्थेमध्ये तिने सांगितले की एक नवीन योग येईल आणि त्याच्या माध्यमातून योग परमचैतन्याशी जोडले जातील.

तिसऱ्या विश्वयुद्धाची भीती आहे, आणि ती अनाठाई नाही.परंतु या योगातून एकमेकांविषयी प्रेम विकसीत करून ते टाळणे शक्य आहे. अजून एक गोष्ट आहे, ती आहे, ज्ञानेश्वरांची. या नव्या युगातील घटनाविषयीचा टेप. मराठी अनुवाद माझ्या जवळ आहे. परंतु इंग्रजी अनुवाद मला करावयास हवा. लोक कसे आत्मसाक्षात्कार मिळवतील आणि काय घडेल. ते एकमेकांवर कसे प्रेम करतील, हे सर्व ज्ञानेश्वरांनी सांगितले आहे आणि या टेपमध्ये हे गाईले गेले आहे. ● ● ●

तरी न्यून ते पुरते । अधिक ते सरते ।।
करुनी घेयावे हे तुमते । विनुविनु असे ।।


२६ जानेवारी २००८, प्रतिष्ठान - पुणे











# ख्रिसमस पूजा २००७, निर्मल नगरी - पुणे















